सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# आदिवासी विकास विभाग

## महाराष्ट्र शासन

आपुलकी समाजाशी,
बांधिलकी कर्तव्याशी

# माहिती पुस्तिका

## सन २०२५–२६













मा. मुख्यमंत्री तसेच मा. मंत्री आदिवासी विकास यांच्या उपस्थितीत आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी यु एन डी पी च्या सहकार्याने CSR परिषदेचे आयोजन






मा.मंत्री आदिवासी विकास यांच्या हस्ते
८ एप्रिल २०२५ रोजी विविध पोर्टलचे उद्घाटन

Shabari Naturals

मा. मंत्री आदिवासी विकास यांच्या हस्ते
शबरी वॉलचे उद्घाटन

# आदिवासी विकास विभाग

महाराष्ट्र शासन

# विभागाच्या योजनांची माहिती पुस्तिका

## सन २०२५-२६

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
मंत्रालय, मुंबई



**मा.श्री.सी.पी.राधाकृष्णन**
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य



**मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा. ना. श्री. एकनाथ शिंदे**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा. ना. श्री. अजित पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा.ना.डॉ.अशोक वुईके**
मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य



**मा.ना.श्री.इंद्रनील नाईक**
राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य

**मंत्री**
**आदिवासी विकास**
**महाराष्ट्र राज्य**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : ०६ मे, २०२५

राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देणारी माहिती पुस्तिका आदिवासी मंत्री या नात्याने आदिवासी विकास विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर अल्पावधीतच या विभागामार्फत प्रकाशित करण्यात आली आहे.

आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत नागरिकांना सविस्तर माहिती मिळावी, यासाठी ही पुस्तिका प्रसिध्द करण्यात येत असल्याने ती आदिवासी जनजाती समुहाला निश्चितच उपयुक्त ठरेल.

महाराष्ट्रातील दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासींच्या कल्याणासाठी सन १९८३ पासून स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची निर्मिती झालेली आहे. केंद्र शासनाद्वारे राबविण्यात येणारी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियान (PMJANMAN), धरती आबा जनजातीय ग्राम उन्नत अभियान, वनहक्क व इतर योजना आदिवासींच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास व्हावा यासाठी सतत कार्यरत आहे. तसेच आदिवासी विकास विभाग आदिवासींसाठी प्रामुख्याने क्षेत्रिय विकास, सामुहिक विकास व वैयक्तिक लाभाच्या योजना राबवित आहे. आदिवासी समाजासाठी सर्वांगीण विकासाची दालने खुली झालेली आहेत. तरी देखील दऱ्या खोऱ्यात, दुर्गम, अतिदुर्गम भागात राहणाऱ्या अज्ञान आदिवासींना याबाबतची माहिती नसते. आदिवासी कार्यकर्ते, संस्था, लोकप्रतिनिधी यांचे माध्यमातून आदिवासींमध्ये विकासात्मक योजनेचा लाभ घेण्याची जाणीव जागृती व्हावी, यादृष्टीने सदर माहिती पुस्तिका निश्चितच उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी विकास विभाग यापुढे उत्तरोत्तर दैदिप्यमान प्रगती करेल याबाबतची आदिवासी मंत्री म्हणून मी खात्री देतो.

आपल्या या उपक्रमास माझ्या हार्दिक शुभेच्छा!

(डॉ. अशोक वुईके)

राज्यमंत्री
आदिवासी विकास
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : ०६ मे, २०२५

## आदिवासी बांधवांसाठी माहितीपुस्तिका – एक उपयुक्त मार्गदर्शक

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते, आदिवासी लोकांची काळजी घेणे हे राज्याचे कर्तव्य आहे. त्यांना शिक्षण, आर्थिक मदत आणि शोषणापासून संरक्षणाची गरज आहे. याच तत्वावर महाराष्ट्र शासनाचा आदिवासी विकास विभाग काम करत आहे .

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य, कौशल्यविकास, रोजगार, स्वयंपूर्णता, महिला सक्षमीकरण, विद्यार्थी वसतिगृहे, शिष्यवृत्ती योजना, अशा अनेक योजनांची अंमलबजावणी आदिवासी विकास विभाग करत आहे. मात्र, या योजनांची संपूर्ण माहिती, आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया व त्याचा लाभ घेण्यासाठीचा मार्ग सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

ही माहितीपुस्तिका हाच उद्देश लक्षात घेऊन तयार करण्यात आलेली आहे. या माध्यमातून प्रत्येक आदिवासी बांधव, विद्यार्थी, पालक, तरुण–तरुणी व महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती सुलभ भाषेत व एकत्र स्वरूपात मिळणार आहे.

या माहितीपुस्तिकेचा उपयोग समाजात जागरुकता वाढवण्यासाठी होईल, तसेच आपल्या हक्काच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ ठरेल, असा मला विश्वास आहे.

ही माहितीपुस्तिका शिक्षण, स्वावलंबन आणि सशक्तीकरणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल असेल.

आपल्या सर्वांच्या सहकार्याने आणि सहभागातून आदिवासी समाजाच्या प्रगतीचा मार्ग अधिक सुलभ आणि व्यापक होईल.

(मा. इंद्रनील नाईक)

# आदिवासी विकास विभाग - महाराष्ट्र राज्य

राज्यातील अनुसूचित जमातीच्या लोकांची संस्कृती व त्यांची मूल्ये यांचा आदर राखून त्यांना सक्षम बनवून त्यांचा विकास सुनिश्चित करणे. भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील अनुसूचित जाती व **अनुसूचित जमातीच्या** लोकाचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घेणे आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासुन संरक्षण करणे. त्याअनुषंगाने अनुसूचित जमातीच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. समाज कल्याण विभागामधून आदिवासी विभागाची निर्मिती सन १९८३ मध्ये करण्यात आली. आदिवासी जनतेच्या विकासासाठी आदिवासी विकास विभाग विविध विकास योजना राबवित आहे.

अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घेण्याची आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणुकीपासुन संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय संविधानातील या मार्गदर्शक तत्वास अनुसरुन पंचवार्षिक योजनामध्ये मागासवर्गीयांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ.कि.मी. एवढे असून त्यापैकी ५०,७५७ चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण १६.५ टक्के एवढे होते. मागील चार दशकांतील राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलनात्मक आकडेवारी खाली देण्यात आली आहे.

| जनगणना वर्ष | राज्याची एकुण लोकसंख्या (लाखात) | आदिवासी लोकसंख्या (लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९७१ | ५०४.१२ | ३८.४१ | ७.६२ |
| १९८१ | ६२७.८४ | ५७.७२ | ९.१९ |
| १९९१ | ७८९.३७ | ७३.१८ | ९.२७ |
| २००१ | ९६८.७९ | ८५.७७ | ८.८५ |
| २०११ | ११२३.७४ | १०५.१० | ९.३५ |

महाराष्ट्र राज्यात एकुण ४५ अनुसूचित जमाती आहेत. त्यात भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकुर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा), कातकरी (मुख्यत: रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणुन अधिसुचित केल्या आहेत.

राज्यात एकुण ३६ जिल्हे आहेत आणि आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक व ठाणे व नवनिर्मित पालघर (सहयाद्री प्रदेश) चंद्रपुर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपुर, अमरावती, व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्हयांमध्ये मुख्यत: अधिक आहे.

१९७५-७६ या वर्षी केंद्र सरकारने निर्देश दिल्याप्रमाणे ज्या गावांतील आदिवासी संख्या एकुण लोकसंख्येच्या ५० टक्यांहुन अधिक असेल, त्या गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये (आयटीडीपी) करण्यात आला. भारत सरकारने मान्यता दिलेले अशाप्रकारे १६ प्रकल्प

होते. नंतर ज्या गावांमधील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्यांपेक्षा थोडी कमी होती, त्या गावांचा समावेशही अशा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रामध्ये करण्यात आला आणि अशी क्षेत्रे अतिरिक्त आदिवासी उपयोजना (एटीएसपी गट / प्रकल्प) म्हणुन ओळखण्यात येऊ लागली. राज्य शासनाची मान्यता मिळालेली अशी ४ अतिरिक्त आदिवासी उपयोजना प्रकल्प क्षेत्रे आहेत. तसेच आदिवासीची लोकसंख्येचे वाढते प्रमाण व मोठे कार्यक्षेत्र पाहता सध्या एकुण प्रकल्प अधिकाऱ्यांची संख्या ३० आहे.

दरम्यानच्या काळात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रालगतच्या प्रदेशातही काही ठिकाणी आदिवासींची वस्ती असल्याचे भारत सरकारच्या लक्षात आले. म्हणुन सुमारे १०,००० लोकवस्तीच्या गावांमध्ये आदिवासींची संख्या ५० टक्यांहुन अधिक असेल तर अशा गावांचा समावेश सुधारीत क्षेत्र विकास खंडामध्ये (माडा) करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले. त्याच प्रमाणे एकुण ५,००० लोकवस्तीच्या दोन किंवा तीन गावांमध्ये ५० टक्यांहुन अधिक आदिवासींची संख्या असेल तर, त्या गावांचा समावेश मिनीमाडा क्षेत्रामध्ये करण्यात यावा, अशा सुचना आहेत. महाराष्ट्रामध्ये एकुण ४३ माडा क्षेत्रे आणि २४ मिनीमाडा क्षेत्रे आहेत.

आदिवासी विकास विभागाकडे सोपविलेल्या कामकाजामध्ये अधिक उत्तरदायी प्रशासन होण्याच्या दृष्टीने १९९२ मध्ये या विभागाची पुनर्रचना करण्यात आली. राज्यात आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे अधिपत्याखाली अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, अमरावती व नागपुर, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ३० कार्यालय कार्यरत असुन, त्यापैकी ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अत्यंत संवेदनशील म्हणुन घोषित करण्यात आले आहे. त्यामध्ये नाशिक, कळवण, तळोदा, जव्हार, डहाणु, धारणी, किनवट, पांढरकवडा, गडचिरोली, अहेरी व भामरागड यांचा समावेश आहे.

********************

# आदिवासी उपयोजना

सन १९७५-७६ पासुन एकात्मीकृत आदिवासी विकास प्रकल्पामध्ये (आयटीडीपी) सर्व मार्गानी मिळणा-या निधीचा विनियोग करण्यासाठी आदिवासी उपयोजना (टिएसपी) सुरु करण्याची कल्पना साकार होऊ लागली. परिणामी आदिवासी उपयोजना आणि आदिवासी विकास प्रकल्प या दोन्ही संज्ञा परस्परांकरिता समान अर्थाने वापरल्या जाऊ लागल्या आणि आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रातच आदिवासी उपयोजना क्षेत्र असे संबोधण्यात येऊ लागले.

राज्य शासनाने श्री. द. म. सुकथनकर, राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन सदर समितीच्या अहवालातील शिफारशी स्वीकारल्या आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. त्यामुळे सदर लोकसंख्या विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी जनतेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशा आशयाची शिफारस सुकथनकर समितीने केली. सदर शिफारशीनुसार टप्प्या टप्प्याने ९ टक्के पर्यंत नियतव्यय उपलब्ध करुन द्यावयाचा होता. त्याप्रमाणे टप्पाटप्प्याने प्रतिवर्षी नियतव्ययात वाढ होऊन सन २००५-०६ पासुन सरासरी ९ टक्के नियतव्यय उपलब्ध होत आहे.

सदर योजनांसाठी कमाल मर्यादेच्या अधीन राहुन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे जिल्हयातील अंमलबजावणी अधिका-यांकडुन आदिवासी उपयोजना क्षेत्र व बाहय क्षेत्रात राबविण्याच्या योजनांचे प्रस्ताव मागवितात व संकलित प्रारुप आराखडा तयार करुन जिल्हा नियोजन मंडळापुढे मंजुरीसाठी सादर करतात. याप्रमाणे प्रत्येक जिल्हा नियोजन मंडळाने मंजूर केलेला जिल्हानिहाय प्रारुप आराखडा संकलित करुन राज्याची जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तयार होते. सदर योजनेत योजनानिहाय प्रस्तावित नियतव्ययास मंजूरी मिळाल्यानंतर मंजूर नियतव्यय अर्थसंकल्पित करुन प्रत्येक विभागास मागणीप्रमाणे आदिवासी विकास विभाग तरतुद उपलब्ध करुन देते. त्याप्रमाणे संबंधित विभागाकडुन मार्गदर्शक सुचनाप्रमाणे खर्च करण्यात येतो व खर्चाचा मासिक प्रगती अहवाल आदिवासी विकास विभागास सादर केला जातो.

आदिवासी विकास विभागामार्फत जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय योजना राबविण्यात येत होत्या. सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात माहे डिसेंबर २०१० पासुन आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक टिएसपी-२००८/प्र.क्र.६/का-६, दिनांक १६ डिसेंबर २००९ अन्वये आदिवासी उपयोजना जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पित करणे, वितरित करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती अंमलात आली आहे.

वरील शासन निर्णयान्वये सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासुन आदिवासी उपयोजनेच्या जिल्हास्तरीय निधी अर्थसंकल्पित करुन, वितरित करणे व त्यामधील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या प्रस्तावित कार्यपध्दतीमध्ये बदल करुन यापुढे आदिवासी उपयोजनेखालील जिल्हास्तरीय निधी अर्थसंकल्पित करणे, तरतुदीचे वितरण व प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, तसेच पुर्नविनियोजन करणे इत्यादीबाबत सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहे.

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासींना वैयक्तिक लाभ देणा-या आणि आदिवासींना सामुहिक तसेच क्षेत्रविकास करण्याकरिता योजना राबविण्यात येतात. जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्याक्रमांतर्गत राज्यातील विविध प्रशासनिक विभागामार्फत अनेकविध योजना राबविण्यात येतात. त्यांचे मुख्यत्वे खालील प्रमाणे विकासशीर्ष आहेत.

| गाभा क्षेत्र (एकूण नियतव्ययाच्या ३/४) | बिगर गाभा क्षेत्र (एकूण नियतव्ययाच्या १/४) |
|---|---|
| १. मागासवर्गीय कल्याण (विशेष क्षेत्र ) | १. नगर विकास |
| २. ग्रामविकास | २. पर्यटन व वनपर्यटन |
| ३. कृषी फलोत्पादन, पशुसंवर्धन, मत्स्यसंवर्धन , वने | ३. सहकार व वस्त्रोद्योग |
| ४. शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण व कौशल्य विकास | ४. वैद्यकीय शिक्षण |
| ५. ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता | ५. जलसंपदा |
| ६. आरोग्य | ६. रस्ते व पुल विकास , सार्वजनिक बांधकाम |
| ७. महिला व बालविकास - पोषण , अंगणवाडी बांधकाम | ७. उद्योग व उर्जा |
| ८. जलसंधारण / लघुपाटबंधारे | ८. नाविन्यपूर्ण योजना, मूल्यमापन व संनियंत्रण |

<u>आदिवासी विकास विभागाची रचना</u>

शासन स्तरावर मा.मंत्री (आदिवासी विकास विभाग), तसेच मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास विभाग) यांच्या अधिपत्याखाली मा. प्रधान सचिव/ सचिव (आदिवासी विकास विभाग) हे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आहेत. शासन स्तरावर अनुसूचित जमातीकरिता विविध धोरणात्मक निर्णय, अर्थसंकल्प इत्यादी बाबी हाताळल्या जातात.

**प्रशासकीय घटक :** आदिवासी विकास आयुक्तालयांचे क्षेत्रीय प्रमुख आयुक्त, आदिवासी विकास आहे. त्यांचे अधिनस्त राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रात ४ प्रादेशिक अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे स्तरावर विभागले असुन त्यांचे प्रमुख भारतीय प्रशासन सेवा या दर्जाचे अधिकारी आहेत. प्रादेशिक कार्यालयाचे विभाजन केलेले असुन **३० प्रकल्प अधिकारी,** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अशी विभागणी करण्यात आलेली आहे.

*******************

## आदिवासी विकास विभागाची प्रशासकीय यंत्रणा रचना पुढीलप्रमाणे आहे

विकास

मा.मंत्री, आदिवासी विकास विभाग

↓

मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग

↓

मा.सचिव, आदिवासी विकास विभाग

↓

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

| | | | |
|---|---|---|---|
| अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक | अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे | अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर |
| प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक/कळवण/तळोदा/राजुर/नंदुरबार/धुळे/यावल (७) | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर/डहाणु/जव्हार/पेण/मुंबई/घोडेगांव/सोलापूर (७) | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,धारणी/पांढरकवडा/कळमनुरी/पुसद/अकोला/किनवट/छ.संभाजीनगर (७) | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर/देवरी/भंडारा/चंद्रपूर/चिमूर/गडचिरोली/अहेरी/भामरागड/वर्धा (९) |
| शा.आ.शा.-२१३<br>अनु.आ.शा.-२२३<br>नामांकित शाळा-५२<br>एकलव्य शाळा-१७<br>शासकीय वसतीगृह-१७६ | शा.आ.शा.-१२६<br>अनु.आ.शा.-७२<br>नामांकित शाळा-२१<br>एकलव्य शाळा-०६<br>शासकीय वसतीगृह-८९ | शा.आ.शा.-८२<br>अनु.आ.शा.-१२७<br>नामांकित शाळा-४९<br>एकलव्य शाळा-०४<br>शासकीय वसतीगृह-१०४ | शा.आ.शा.-७६<br>अनु.आ.शा.-१३१<br>नामांकित शाळा-४०<br>एकलव्य शाळा-१०<br>शासकीय वसतीगृह-१२१ |

# आदिवासी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना

| अ.क्र | योजनेचे नाव | |
|---|---|---|
| (१) | शासकीय आश्रमशाळा समूह योजना | |
| (२) | स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य | |
| (३) | शासकीय आश्रमशाळेत कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणे | |
| (४) | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे. | |
| (५) | पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना | |
| (६) | आदिवासी मुला-मुलींची शासकीय वसतिगृहे | |
| (७) | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती) योजना | |
| (८) | राज्यातील शासनमान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कांच्या प्रतिपूर्तीबाबत | |
| (९) | व्यावसायिक पाठयक्रमात शिकणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे. | |
| (१०) | महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी : एकलव्य मॉडेल निवासी शाळा योजना | |
| (११) | सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना | |
| (१२) | अनुसूचित जमातीच्या मुलां-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे. | |
| (१३) | केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) | |
| (१४) | मोटार वाहनचालक प्रशिक्षण केंद्र योजना | |
| (१५) | सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण योजना | |
| (१६) | प्रधानमंत्री आदि आदर्श योजना | |
| (१७) | प्रधानमंत्री जनजाती महा न्याय अभियान | |
| (१८) | धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान | |
| (१९) | आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणा-या सामाजिक कार्यकर्त्यांना संस्थांना आदिवासी सेवक/ सेवा संस्था पुरस्कार. | |
| (२०) | राज्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजना राबविणे | |
| (२१) | भूमिहीन दारिद्रय रेषेखालील आदिवासीचे सबळीकरण व स्वाभिमान योजना | |
| (२२) | ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम | |
| (२३) | शबरी आदिवासी घरकुल योजना | |
| (२४) | भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना- टप्पा १ | |
| (२५) | भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना- टप्पा २ | |
| (२६) | अनुसूचित क्षेत्रातील पंचायत विस्तार (PESA) | |
| (२७) | आदिवासी विकास महामंडळ | |
| (२८) | शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित | |
| (२९) | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे | |
| (३०) | अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ व सुधारित नियम २०१२ अंमलबजावणी | |

# १. शासकीय आश्रमशाळा समूह योजना

२.

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | मुख्याध्यापक / प्राचार्य, शासकीय आश्रमशाळा |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | आश्रमशाळा संहिता सन -२०१९ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | महाराष्ट्र राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातींची सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी सन १९७२-७३ पासून क्षेत्रविकासाचा दृष्टिकोन स्वीकारुन शासकीय आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या आहेत.<br>आश्रमशाळांमध्ये इ. १ ली ते १२ वी पर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. त्यापैकी १५६ आश्रमशाळांना कनिष्ठ महाविद्यालय संलग्न आहेत.<br>१. आश्रमशाळेत मोफत प्रवेश<br>२. प्रवेशित विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण, निवास, भोजन पुरविण्यात येते. तसेच दैनंदिन वापरावयाच्या वस्तू, गणवेश, अंथरुण पांघरुण, अभ्यासक्रमावर आधारित क्रमिक पुस्तके, शालेय स्टेशनरी, लेखन साहित्य इ. पैकी काही वस्तुच्या खरेदी साठी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात डी.बी.टी. व्दारे रक्कम थेट जमा करण्यात येते.<br>३. विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीकरिता वैद्यकीय पथकाची सुविधा.<br>४. शाळेतील विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धा परिक्षा राबविल्या जातात. त्यात शिष्यवृत्ती/ नवोदय शाळा/ आदर्श आश्रमशाळा/ एकलव्य निवासी शाळा प्रवेश परिक्षा इ. स्पर्धा परिक्षांचा समावेश असतो. |
| ०४ | पात्रता/निकष | १. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>२. इ. १ ली या वर्गासाठी प्रवेशाच्या वेळेस विद्यार्थ्यांचे वय ६ वर्ष पूर्ण असावे. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | प्रवेश अर्जाचा नमुना शासकीय आश्रमशाळेत उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | प्रवेश अर्ज संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य, शासकीय आश्रमशाळा या ठिकाणी उपलब्ध आहेत. |
| ०७ | अर्जाची किंमत असल्यास किती ? | विनामूल्य उपलब्ध |

| | | |
|---|---|---|
| ०९ | जोडावयाची कागदपत्रे | १. उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले पालकाचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र,<br>२. प्रवेशार्थी विद्यार्थ्यांचा जन्मतारखेचा दाखला (गट विकास अधिकारी / ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी इ.)<br>३. जन्माचा दाखला नसल्यास आई-वडीलांचे प्रतिज्ञापत्र.<br>४. पहिली व्यतिरिक्त इतर वर्गातील प्रवेशाकरिता पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला.<br>५. विद्यार्थ्यांचे तसेच पालकांचे आधारकार्ड.<br>६. विद्यार्थी व पालकाच्या बँक पासबुक खात्याची झेरॉक्स. |
| १० | अर्ज विक्री व स्वीकृती कालावधी | १. इ. १ ली प्रवेशासाठी माहे १ एप्रिल ते ३० एप्रिल अखेर. आश्रमशाळा पंचक्रोशीतील गावात पटनोंदणी व इ. २ री ते इ. १० मधील रिक्त जागांबाबत पंचक्रोशीत माहिती देवून प्रवेशासाठी आवाहन करण्यात येते.<br>२. इ. २ री ते इ. १० वीतील रिक्त विद्यार्थी जागांच्या प्रवेशासाठी<br>• दि. २ मे ते १५ मे प्रवेश अर्ज वितरण<br>• दि. २० मे ते ५ जून प्रवेश अर्ज स्वीकृती<br>• दि. ६ जून ते १० जून प्राप्त प्रवेश अर्ज छाननी व प्रवेश. |
| ११ | प्रवेशासाठी कालमर्यादा | १. दि. १ जून ते १५ जून पर्यंत पटनोंदणीतील पात्र विद्यार्थ्यांना इ.१ लीत प्रवेश देणे.<br>२. दि. ११ जून ते १५ जून पर्यंत इ. २ री ते १० वीत प्रवेश देणे. |
| १२ | विहित कालावधीत प्रवेश न दिला गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाची ते कार्यालय | संबंधित एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय |

## २.स्वयंसेवी संस्थांना अनुदानित आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी करणारा अधिकारी / कर्मचारी | मुख्याध्यापक / प्राचार्य अनुदानित आश्रमशाळा |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | आश्रमशाळा संहिता २०१९ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | आदिवासींच्या शैक्षणिक विकासाकरिता स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या मान्यता प्राप्त आश्रमशाळांना शासनाकडून शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वेतन अनुदान, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या अल्पोपहार, भोजन व गणवेश खर्चासाठी परिपोषण अनुदान दिले जाते. आश्रमशाळेच्या कार्यालयीन खर्चासाठी व विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य इ. अनुषंगिक खर्चासाठी आकस्मिक अनुदान दिले जाते. आश्रमशाळेसाठी शालेय इमारत व वसतिगृहासाठी इमारत भाडयाने घेण्यासाठी इमारत भाडे देण्यात येते.<br>• अनुसूचित जमातीच्या पात्र विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश<br>• विनाशुल्क शिक्षण<br>• प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, अंथरुण पांघरुण, जेवणासाठी ताट, वाटी, ग्लास, शालेय पुस्तके, लेखन साहित्य व इतर शैक्षणिक साहित्य इ. मोफत सुविधा. |
| ०४ | पात्रता/निकष | विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. इ.१ लीत प्रवेशाच्या वेळेस त्याचे वय ६ वर्ष पूर्ण असावे. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | प्रत्येक अनुदानित आश्रमशाळेत उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | संबधित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य, अनुदानित आश्रमशाळा |
| ०७ | अर्जाची किमंत असल्यास किती ? | विनामूल्य उपलब्ध |
| ०८ | जोडावयाची कागदपत्रे | १. पालकाचा उपविभागीय अधिकारी / तहसीलदार यांनी दिलेले अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र,<br>२. प्रवेशार्थी विद्यार्थ्यांचा गट विकास अधिकारी / ग्रामसेवक यांनी दिलेला जन्मतारखेचा दाखला<br>३. जन्माचा दाखला नसल्यास आई-वडिलांचे प्रतिज्ञापत्र.<br>४. पहिली व्यतिरिक्त इतर वर्गातील प्रवेशाकरिता पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला. |

| | | |
|---|---|---|
| ०९ | अर्ज विक्री व स्वीकृती कालावधी | १. इ. १ ली प्रवेशासाठी अर्ज विक्री न करता माहे १ एप्रिल ते ३० एप्रिल अखेर आश्रमशाळा पंचक्रोशीतील गावात जाऊन संबंधित शाळेचे शिक्षक पटनोंदणी करतात. इ. २ री ते १० वीतील रिक्त जागाबाबत पंचक्रोशीतील गावांमध्ये माहिती देवून प्रवेशासाठी आवाहन करतात.<br>२. इ. २ री ते इ. १० वीतील विद्यार्थी प्रवेश<br>• दि. २ मे ते १५ मे प्रवेश अर्ज वितरण<br>• दि. २० मे ते ५ जून प्रवेश अर्ज स्वीकृती<br>• दि. ६ जून ते १० जून प्राप्त प्रवेश अर्ज छाननी व प्रकल्प कार्यालयाकडून मान्यता |
| १० | प्रवेशासाठी कालावधी | १. दि. १ जून ते १५ जून पर्यंत पटनोंदणीतील पात्र विद्यार्थ्यांना इ.१ लीत प्रवेश देणे.<br>२. दि. ११ जून ते १५ जून पर्यंत इ. २ री ते १० वीत प्रवेश देणे.<br>३. त्यानंतरही रिक्त जागा राहिल्यास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मान्यतेने रिक्त जागेच्या मर्यादेत अर्ज स्वीकृती करुन प्रवेश दिला जातो. |

## ३.शासकीय आश्रमशाळेत कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणे

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी करणारा अधिकारी / कर्मचारी | प्राचार्य, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा |
| ०२ | कायदे / नियम /शासन निर्णय | १. आश्रमशाळा- संहिता २०१९ नुसार |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती लाभ | शासकीय आश्रमशाळांमध्ये इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेले अनुसूचित जमातीचे विदयार्थी हे आर्थिक अडचणींमुळे तालुक्याच्या अगर जिल्हयाच्या ठिकाणी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेऊ शकत नाही. शासकीय आश्रमशाळांमध्येच त्यांना उच्च माध्यमिक शिक्षण घेता यावे म्हणुन शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत कला व विज्ञान शाखेचे कनिष्ठ महाविद्यालये जुलै १९९९ पासुन सुरु करण्यात आलेली आहे.<br>• विनाशुल्क शिक्षण<br>• प्रवेशित विद्यार्थ्यांना विनामुल्य शिक्षण, निवास, भोजन पुरविण्यात येते. तसेच गणवेश, अंथरुण पांघरुण, ताट वाटी, अभ्यासक्रमावर आधारित क्रमिक पुस्तके, शालेय स्टेशनरी, लेखन साहित्य इ. पैकी काही वस्तुच्या खरेदी साठी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात डी.बी.टी. व्दारे रक्कम थेट जमा करण्यात येते.<br>• विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीकरिता वैद्यकीय पथकाची सुविधा.<br>• शाळेतील विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धा परिक्षा राबविल्या जातात. तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर व्यवसायिक स्पर्धा परिक्षांचे आयोजन करण्यात येते. उदा.JEE, NEET इ. |
| ०४ | पात्रता/निकष | विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>विद्यार्थी इयत्ता १० वी उत्तीर्ण असावा. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | प्रवेश अर्जाचा नमुना शासकीय आश्रमशाळेत उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | प्रवेश अर्ज संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य, शासकीय आश्रमशाळा या ठिकाणी उपलब्ध आहेत. |
| ०७ | अर्जाची किमंत असल्यास किती | सदर प्रवेश अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०८ | जोडावयाची कागदपत्रे | १) प्रत्यक्ष प्रवेशावेळी पालकाचा / विद्यार्थ्यांचा अनुसूचित जमातीचा दाखला.<br>२) जन्मतारखेचा दाखला.<br>३) जन्माचा दाखला नसल्यास आई-वडीलांचे प्रतिज्ञापत्र.<br>४) पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला. |
| ०९ | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत प्रवेश देण्यात येतो. | रिक्त जागेच्या उपलब्धतेनुसार शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर १० दिवसांच्या आत प्रवेश दिला जाईल. |
| १० | ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय | संबंधित एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय. |

## ४.अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शाआशा-२००८/प्र.क्र.८१/का-१३, दिनांक २८ ऑगस्ट, २००९.<br>२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.नानिशा-२०१५/प्र.क्र.११८/का-१२, दि.२१ एप्रिल, २०१५.<br>३. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.नानिशा-२०१५/प्र.क्र.३८७/का-१२, दि.२७ जुन, २०१६.<br>४. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.नानिशा-२०१८/प्र.क्र.२१/का-१२, दि. १८ मे, २०१८. |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी याकरिता सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासुन शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इ. १ ली ते १२ वीपर्यंत शिक्षण देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.<br>• नामांकित शाळेतील विद्यार्थ्यांना संबंधित नामांकित शाळेमार्फत शालेय गणवेश, वह्या, पुस्तके, बुटमोजे, रेनकोट, अंडर गारमेंटस्, भोजन, निवास खर्च इ. सुविधा पुरविण्यात येतात. ट्युशन फी, प्रवेश फी, सुरक्षा अनामत, शिक्षण शुल्क इत्यादीपोटी अनुज्ञेय रक्कम आदिवासी विकास विभागामार्फत नामांकित शाळेस अदा करण्यात येते.<br>• शाळेतील सुविधानुसार शाळांची वर्गवारी करण्यात येते.त्याप्रमाणे प्रतिविद्यार्थी गुणांकनानुसार प्रतिवर्षी रु.५०,०००/-रु.६०,०००/- व रु.७०,०००/-असे शुल्क शाळांना देण्यात येते. |
| ०४ | पात्रता/निकष | १. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>२. पालकांच्या उत्पन्नाची कमाल मर्यादा रु.१.०० लाख<br>३. विद्यार्थी दारिद्र्य रेषेखालील असेल तर त्यासंबंधीचा यादीतील अनुक्रमांक नमूद करण्यात यावा. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | अर्ज नमुना संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात उपलब्ध आहे. |
| ०६ | जोडावयाची कागदपत्रे | प्रत्यक्ष प्रवेश देतेवेळी पालकांचा अनुसूचित जमातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, विद्यार्थ्यांचा जन्मतारखेचा दाखला, जन्माचा दाखला नसल्यास आई-वडिलांचे संमतीपत्र. |

## ५.पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १. आ.वि.वि., शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६ /प्र.क्र.८७/का-१२, दि.१५.१०.२०१६.<br>२. आ.वि.वि., शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२, दि. २७.१०.२०१८.<br>३. आ.वि.वि., शासन निर्णय क्र. आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२, दि.१६ सप्टेंबर, २०१९. |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती / अनुज्ञेय सेवा | शासकीय वसतिगृह प्रवेश क्षमता पूर्ण झाल्यानंतर इ १२.वी नंतरच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या तथापि विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घेण्यासाठी अर्थसहाय्य केले जाते. तसेच सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्यात येऊन इ १० .वी नंतर केंद्रीय पध्दतीने प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांचा समावेश योजनेत करण्यात आलेला आहे.सदर योजनेत महानगर स्तरावर रु,५१००/-.विभागस्तरावर रु,६०००/-. ४३००/-. जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर रु ३८००/-. याप्रमाणे प्रतिमाह रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते . |
| ०४ | पात्रता/निकष | १. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>२. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक कमाल उत्पन्न मर्यादा रु.२.५० लक्ष पर्यंत राहील.<br>३. विद्यार्थ्याने १२ वी नंतरच्या किमान २ वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | • अर्ज नमुना https:// swayam. mahaonline. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती | • सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहे. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | जातीचा दाखला, जातीचे वैधता प्रमाणपत्र, वार्षिक उत्पन्न दाखला.मागील वर्षाची गुणपत्रिका इ , |

# ६.आदिवासी मुलां/मुलींकरिता शासकीय वसतिगृहे

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित गृहपाल, शासकीय वसतिगृह |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.आवप्र-१२०४/प्र.क्र.५२/का-१२, दि.०३.०८.२००४.<br>२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.आविवि-२०११/प्र.क्र.१७१/का-१२, दि.११ नोव्हेंबर, २०११.<br>३. आदिवासी विकास विभाग, शासन शुद्धीपत्रक, क्र.आविवि-२०११/प्र.क्र.१७१/का-१२, दि.१० एप्रिल, २०१३.<br>४. आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय,क्र.आवगृ-२०१७/प्र.क्र.१८/का.१२,दिनांक०६,मे,२०१७.<br>५. आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय,क्र.आवगृ-२०१७/ प्र.क्र.१८/का.१२,दिनांक ०५ एप्रिल,२०१८.<br>६. आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय,क्र.आवगृ-२०१७/ प्र.क्र.१८/ का.१२,दिनांक २९,मे,२०१८. |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती | अनुसूचित जमातीच्या मुलां / मुलींना उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची शैक्षणिक उन्नती व्हावी या उद्देशाने सदर योजना सुरु करण्यात आलेली आहे.<br>• शासकीय वसतिगृहात प्रवेश देऊन त्यांना निवास, भोजन, अंथरुण, पांघरुण, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक व इतर आवश्यक साहित्य मोफत ( डी.बी.टी. द्वारे ) पुरविणे. |
| ०४ | पात्रता/निकष | १. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>२. पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु२.५०. लक्ष<br>३. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन त्यांची छाननी प्रकल्प कार्यालयमार्फत होवून पात्र विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देण्यात येतो.<br>४. ग्रामीण व तालुकास्तरावरील वसतिगृहामध्ये इयत्ता ८ वी पासून पुढे प्रवेश देण्यात येतो व उर्वरीत वसतिगृहामध्ये इयत्ता ११ वी पुढील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | अर्ज नमुना https:// swayam. mahaonline. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ०६ | जोडावयाची कागदपत्रे | १. शाळा सोडल्याचा दाखला<br>२. ज्या इयत्तेत उत्तीर्ण झाले गुणपत्रिकेची प्रत<br>३. दारिद्र्य रेषेखालील असल्यास प्रमाणपत्र.<br>४. उपविभागीय अधिकारी / तहसीलदार यांनी दिलेले |

| | | |
|---|---|---|
| | | पालकाचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र,<br>५. पालकांचा सक्षम अधिकाऱ्याचा उत्पन्नाचा दाखला.<br>६. कुटूंबाचे हमीपत्र. |
| ०७ | अर्ज विक्री व स्वीकृती कालावधी | • दि. २ मे ते १५ मे प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरणे.<br>• दि. २० मे ते ५ जून प्रवेश अर्ज स्वीकृती.<br>• दि. ६ जून ते १० जून प्राप्त प्रवेश अर्ज छाननी व प्रकल्प कार्यालय मान्यता<br>• महाविद्यालय प्रवेश प्रक्रिया कालावधी नुसार विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्यास संधी दिले जाते. |
| ०८ | अपेक्षित कालावधी | **प्रवेश**<br>• विद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी दि. २६ मे ते ३१ मे अखेर पर्यंत अर्ज छाननी व १ जून ते १० जून पर्यंत प्रत्यक्षात प्रवेश<br>• कनिष्ठ महाविद्यालयीन (इ. ११ वी) विद्यार्थ्यांसाठी दि.२६ जून ते ३० जून अर्ज छाननी व १ ते १० जुलै पर्यंत प्रत्यक्षात प्रवेश.<br>• महाविद्यालयीन (प्रथम वर्ष) विद्यार्थ्यांसाठी २१ जून ते २५ जून पर्यंत अर्ज छाननी व २६ जून ते ३० जून पर्यंत प्रत्यक्षात प्रवेश<br>• व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सदर मुदत अभ्यासक्रमाचे निकालावर अवलंबुन राहील. |

## ७.अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती) योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती) योजना |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृत्ती-२०२१/प्रक्र९०/का-१२ दि.१७ जानेवारी २०२२ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर उच्च शिक्षणाकरिता प्रोत्साहित करण्याच्या दृष्टिने व त्यांना उच्च शिक्षणाचा खर्च भागविता यावा म्हणून भारत सरकारद्वारा ही योजना राबविली जाते.<br>१. वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांना रु. १२००/- व अनिवासीसाठी रु. ५५०/- मासिक निर्वाह भत्ता<br>२. तांत्रिक, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक इ.शास्त्र अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यासाठी रु.८२०/- दरमहा व अनिवासी विद्यार्थ्यांसाठी रु.५३०/- दरमहा मासिक निर्वाह भत्ता<br>३. पदवीचे सामान्य अभ्यासक्रम, अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र वास्तुकला इ. साठी निवासी रु. ५७०/- अनिवासीसाठी रु. ३००/- मासिक निर्वाह भत्ता<br>४. इ.११ वी व १२ वीसाठी व पदवीचे पहिल्या वर्षातील निवासी विद्यार्थ्यासाठी दरमहा रु.३८०/- व अनिवासीसाठी रु.२३०/- मासिक निर्वाहभत्ता देण्यात येतो.<br>५. वरील अभ्यासक्रमांचे अनुज्ञेय शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क संबंधित महाविद्यालयास अदा केले जाते. |
| ०४ | पात्रता/निकष | • विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>• पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये २.५० लाख.<br>• विद्यार्थी पूर्णवेळ नोकरीत नसावा.<br>• एकाच कुटूंबातील सर्वांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | ऑनलाईन अर्ज नमुना https://mahadbt.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती ? | अर्ज विनामूल्य उपलब्ध आहे. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | प्रत्यक्ष योजनेचा लाभ देतेवेळी जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, प्रवेश पावती व अनुषंगिक कागदपत्रे |

## ८.राज्यातील शासनमान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना.

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृत्ती-२०२१/प्र.क्र.९४/का-१२ दि.१७ जानेवारी २०२२ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती | राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या वैद्यकीय शिक्षण व संलग्न शिक्षणाकरिता खाजगी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना याअंतर्गत शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती केली जाते.<br>अ. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)<br>ब. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असणारे अभियांत्रिकी, औषधनिर्माण, एच.एम.सी.टी., एच.एम.सी.टी., वास्तुशास्त्र, एम.बी.ए., एम.सी.ए<br>क. कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत पदविकातंर्गत पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम.<br>या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना शुल्क निर्धारण समिती व तत्सम समितीने मंडळाने ठरवुन दिलेल्या दराने शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती केली जाते. |
| ०४ | पात्रता/निकष | • विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>• पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये २.५० लाखापेक्षा जास्त असावी<br>• विद्यार्थी पूर्णवेळ नोकरीत नसावा.<br>• एकाच कुटूंबातील सर्वांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.<br>• व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतेवेळी जातवैधता प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.<br>• विद्यार्थी हा माध्यमिक / उच्च माध्यमिक किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ / बोर्डाची समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावा. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | ऑनलाईन अर्ज नमुना https://mahadbt.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | प्रत्यक्ष योजनेचा लाभ देतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र ,जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, प्रवेश पावती व अनुषंगिक कागदपत्रे |

## ९. व्यावयायिक पाठ्याक्रमात शिकणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आवगृ-१२०४/प्र.क्र.१८/का-१२, दि.२४ ऑगस्ट, २००४. |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्यामुळे इतर आर्थिक सवलतीशिवाय व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणाऱ्या खर्चाची तोंडमिळवणी करता यावी म्हणून निर्वाह भत्ता देण्याची योजना<br>अ. ४ ते ५ वर्षाच्या अभ्यासक्रमा साठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.७००/- दरमहा व वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. १०००/- दरमहा निर्वाह भत्ता<br>ब. २ ते ३ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.५००/-दरमहा व वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.७००/- दरमहा निर्वाह भत्ता<br>क. २ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.५००/- दरमहा व वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. ५००/- दरमहा निर्वाह भत्ता दिला जातो. |
| ०४ | पात्रता/निकष | १. अनुसूचित जमातीचा विद्यार्थी व्यावसायिक पाठयक्रमात प्रवेशित असावा.<br>२. विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्तीधारक असावा.<br>३. व्यावसायिक पाठ्यक्रमांत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांने प्रथम त्यांच्या महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश घेणे बंधनकारक आहे.<br>४. पालकाचे उत्पन्न भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेच्या पात्रतेसाठी जे उत्पन्न असेल तितके असावे. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | ऑनलाईन अर्ज नमुना https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | प्रत्यक्ष प्रवेश देतेवेळी सक्षम प्राधिकाऱ्याचा पालकाचा / विद्यार्थ्यांचा जमातीचा दाखला, जन्मतारखेचा दाखला, पालकाचा सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला. |

# १०.महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी एकलव्य मॉडेल निवासी शाळा योजना

| अ.क्र. | मुद्या | तपशील |
|---|---|---|
| १ | योजना अंमलबजावणी अधिकारीकर्मचारी/ | प्राचार्य |
| २ | कायदे शासन निर्णय/नियम/ | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शाआशा१०००/प्र.क्र.४८/का.१३, दि.११/९/२०००. |
| ३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | एकलव्य मॉडेल निवासी आश्रमशाळेसाठी केंद्र शासनाकडून सध्या रु.१०९०००/-प्रति विद्यार्थी/ प्रतिवर्षी अनुदान मिळते. सदर अनुदानातून शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी तेथील विद्यार्थी व व्यवस्थापन यावरील खर्च भागविण्यात येतो. |
| ४ | पात्रता/निकष | १) विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>२) एकलव्य निवासी शाळांमध्ये CBSE च्या अभ्यासक्रमानुसार इयत्ता ६ वी ते १२ वीच्या वर्गात शिक्षण देण्यात येते. सर्व शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळा, नगरपालिका व महानगरपालिका अंतर्गत शाळा, शासन मान्य अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांतील इयत्ता ५ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेशपूर्व परिक्षा घेऊन इयत्ता ६ वी मधील प्रवेशांसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. |
| ५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | संबंधित शासकीय / अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, शासन मान्य अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांचे प्राचार्य/ मुख्याध्यापक यांच्याकडे अर्जाचा नमूना उपलब्ध करून देण्यात येतो. |
| ६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | अर्ज संबंधित शासकीय, अनुदानित आश्रमशाळा/ जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, शासन मान्य अन्य प्राथमिक माध्यमिक/ शाळांचे प्राचार्य, एकलव्य मॉडेल निवासी शाळा यांच्याकडे अर्जाचा नमूना उपलब्ध करून देण्यात येतो. |
| ७ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ८ | जोडावयाची कागदपत्रे | १. शाळा सोडल्याचा दाखला<br>२. इयत्ता ५ वी ची मार्कशीट छायांकित प्रत<br>३. पासपोर्ट साईज फोटो २<br>४. वैद्यकीय प्रमाणपत्र शासकीय रुग्णालय<br>५. उत्पन्नाचा दाखला वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा |

| | | |
|---|---|---|
| | | रु. ६.०० लक्ष आत राहील.<br>६. जातीचा दाखला पालकाचा /विद्यार्थ्याचा<br>७. रेशनकार्डाची छायांकित प्रत<br>८. रहिवासी दाखला<br>९. शंभर रुपये स्टॅम्प पेपरवर हमीपत्र<br>१०.आधार कार्डाची छायांकित प्रत वडिलांचे, विद्यार्थ्याचे, आईचे (२ प्रती) व आधार कार्ड<br>११.विद्यार्थ्याचे बँक पास बुकची छायांकित प्रत (२ प्रती) |
| ९ | प्रवेश देण्याचा कालावधी | प्रवेश परिक्षेचा निकाल लागल्यानंतर उपलब्ध जागेनुसार संबंधित एकलव्य निवासी शाळांच्या प्राचार्यामार्फत प्रवेश देण्यात येतो. |
| १० | प्रवेशासंबधी ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय. |

# ११.सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मुद्दा</th><th>तपशील</th></tr>
<tr><td>०१</td><td>अंमलबजावणी यंत्रणा</td><td>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), संबंधित जिल्हा परिषद.</td></tr>
<tr><td>०२</td><td>कायदे / नियम / शासन निर्णय</td><td>१. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक आविशी-२००९/प्र.क्र. २०/ का. १२ दि. ३१ मे २०१०<br>२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृ - २०१७/प्र.क्र. १३४/ का. १२ दि. १७ एप्रिल २०१८</td></tr>
<tr><td>०३</td><td>थोडक्यात कार्यपध्दती व लाभ</td><td>राज्यातील अनुसूचित जमातीच्या इयत्ता १ ली ते १० वी मध्ये आश्रमशाळा व्यतिरिक्त इतर मान्यताप्राप्त शाळेत शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक व इतर किरकोळ खर्च भागविणे व अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांची गळती थांबविणेसाठी सदर योजनेचा खालील प्रमाणे लाभ देण्यात येतो.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>इयत्ता</th><th>शिष्यवृत्तीचा वार्षिक दर प्रति विद्यार्थी/ प्रति विद्यार्थीनी</th></tr>
<tr><td>१</td><td>इ. १ ली ते इ. ४ थी</td><td>रु. १०००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>इ. ५ वी ते इ. ७ वी</td><td>रु. १५००/-</td></tr>
<tr><td>३</td><td>इ. ८ वी ते इ. १० वी</td><td>रु. २०००/-</td></tr>
</table>
• सदर रक्कम विद्यार्थ्यांच्या बॅक खात्यात वर्ग करण्यात येते.<br>
१. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी व त्याचे आई वडील यांनी विहीत नमुन्यात अर्ज करून तो शाळेच्या मुख्यध्यापकांकडे सादर करावा. आई/वडील हयात नसल्यास विद्यार्थ्यांच्या पालकांनी अर्ज सादर करावेत.<br>
२. १० वर्षे वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांचे आई/वडील/कायदेशीर पालक यांच्या नावाने खात्याची माहिती व १० वर्षावरील विद्यार्थ्यांचे स्वतःचे बँक खात्याची माहिती.</td></tr>
<tr><td>०४</td><td>पात्रता/निकष</td><td>१. अनुदानित/विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक शाळा, जिल्हा परिषदांच्या शाळा, नगरपालिका व महानगरपालिकांच्या शाळांमध्ये इ. १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या पात्र विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत लाभ घेता येईल.<br>
२. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रतिमाह ८०% असणे आवश्यक आहे.<br>
३. शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.<br>
४. नामांकित शाळांमध्ये, सैनिकी शाळांमध्ये, इंग्रजी माध्यमाच्या</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या ज्यामध्ये शासनाकडून त्यांच्या शिक्षणाचा खर्च अदा करण्यात येतो अशा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.<br>५. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शासकीय, निमशासकीय (केंद्र व राज्य शासन) व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (केंद्र व राज्य शासन) तसेच शासन अनुदानित संस्थामध्ये सेवा करत आहेत, तसेच ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू.१.०८ लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती अंतर्गत लाभ देय राहणार नाही.<br>६. नापास झालेल्या विद्यार्थ्यांना त्याच इयत्तेमध्ये दुसऱ्यांदा सदर योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही. परंतु सदर नापास विद्यार्थी पास होऊन त्यांनी वरच्या इयत्तेत प्रवेश मिळविल्यास त्यांना त्या इयत्तेमध्ये या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ देय राहणार राहील. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | सदर अर्ज संबंधित प्राथमिक / माध्यमिक शाळेत उपलब्ध आहेत. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | १. प्रत्यक्ष प्रवेशावेळी पालकाचा / विद्यार्थ्यांचा अनुसूचित जमातीचा दाखला<br>२. पालकांचा उत्पनाचा दाखला.<br>३. विद्यार्थ्यांचे / पालकांचे बँक खात्याची माहिती.<br>४. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड<br>५. पालकांच्या उत्पनाचा दाखला (तहसीलदार यांनी निर्गमित केलेला.) |

## १२.अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणेबाबत

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | आयुक्त,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य,नाशिक |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. १५२२-प्रक्र१२ (भाग-१)/का-१२ दि ७ मार्च २०२४<br>२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. १५२२- प्रक्र१२ (भाग-१)/का-१२ दि १२ जुलै २०२४<br>३) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. १५२२- प्रक्र१२ (भाग-१)/का-१२ दि ९ सप्टेंबर २०२४ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | एम.बी.ए. (पदव्युत्तर), बी.टेक (इंजिनअरिंग) (पदवी / पदव्युत्तर), विज्ञान (पदवी / पदव्युत्तर), कृषी (पदवी / पदव्युत्तर), इतर विषयाचे अभ्यासक्रम (पदवी / पदव्युत्तर) मधील एकूण ४० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल<br>अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा यासाठी या योजनेतंर्गत शिक्षण शुल्क, भोजन, निवास, प्रवास, प्रासंगिक भेटी, इ. अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी सहाय्य केले जाते. तसेच व्हिजा, आरोग्य विमा व येण्या-जाण्याचा विमानाचा खर्च शासनामार्फत करण्यात येतो. |
| ०४ | पात्रता/निकष | १. विद्यार्थी अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्रधारक असावा<br>२. विद्यार्थ्याला परदेशातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची रँक ३०० च्या आत असलेल्या विद्यापीठात प्रवेश मिळालेला असावा.<br>३.विद्यार्थ्यांच्या पालकांचे / कुटुंबाचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.१०.०० लाखापेक्षा जास्त नसावे.<br>४.सदर शिष्यवृत्ती आदिवासी एकाच कुटूंबातील दोन व्यक्तीस अनुज्ञेय राहील. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | • अर्ज नमुना https://fs.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती | • सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | पदवी / पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुरावे.<br>परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याबाबत विनाअटी (Unconditional) ऑफर लेटर, आवश्यक ते करारनामे हमीपत्रे व शासन निर्णयातील इतर आवश्यक कागदपत्रे. |

# १३.केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ०२ | कायदे / नियम / शासन | १. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. न्युबयो-२०११/प्र.क्र.०७ /का-७, दिनांक २१ जून २०१३<br>२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. न्युबयो-२०२२/प्र.क्र.९५ /का-९, दिनांक ११ जुलै २०२३ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती | ज्या योजनाचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्वाच्या कर्जविरहीत योजना तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करुन गरजु आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवुन देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.<br>१. गट- अ मध्ये लाभार्थ्यासाठी उत्पन्न निर्मिती व उत्पन्न वाढीच्या योजनांचा समावेश होतो.<br>२. गट- ब प्रशिक्षणाच्या योजना (दिनांक ११ जुलै २०२३ च्या शासन निर्णयान्वये सदर गट वगळण्यात आला आहे.)<br>३. गट-क- मध्ये लाभार्थ्यासाठी मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणकारी योजनांचा समावेश आहे. |
| ०४ | योजने अंतर्गत लाभ | १. या योजनेतंर्गत प्रत्येक आदिवासी व्यक्तीस / कुटूंबास / लाभाची आर्थिक मर्यादा रु.५०,०००/- पर्यंत आहे.<br>२. तर सामुहिक प्रकल्प/कार्यक्रमांतर्गत रु.७,५०,०००/- आहे<br>३. आदिम जमाती करीता १००% तसेच इतर सर्वसाधारण आदिवासी लाभार्थ्यां करिता ८५ % अनुदान देय आहे. |
| ०५ | पात्रता/निकष | १. लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>२. अ या गटासाठी लाभार्थी दारिद्रय रेषेखालील असावा.<br>३. लाभार्थीनी सर्व कागदपत्रासह योजनेच्या लाभासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक. |
| ०६ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे उपलब्ध आहे. |
| ०७ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे उपलब्ध आहे. |
| ०८ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०९ | जोडावयाची कागदपत्रे | १. अनुसूचित जमातीचा दाखला<br>२. दारिद्रय रेषेचा दाखला (आवश्यक तेथे)<br>३. तसेच इतर अनुषंगिक कागदपत्रे |

| | | |
|---|---|---|
| १० | अपेक्षित कालावधी | अर्ज प्राप्त झाल्यापासुन व परिपूर्ण कागदपत्रासह सहा महिन्याच्या कालावधीत<br>१. योजनांच्या आराखडयास मंजूरी मिळाल्यानंतर इच्छुक उमेदवार व संस्थांकडुन अर्ज मागविणे, छाननी अंती लाभार्थी व संस्था निश्चित करणेकरिता - १५ दिवस<br>२. ज्येष्ठता यादी व योजनानिहाय लाभार्थी यादी निश्चित करणे, संस्था व लाभार्थी निवड यादीस मान्यता घेणे - २५ दिवस<br>३. प्रत्यक्ष योजनेचा लाभ देण्यास योजनेच्या स्वरुपानुसार १ ते ६ महिन्याचा कालावधी |
| ११ | योजनेसंबधी काही तक्रार असल्यास संपर्क करावयाचे कार्यालय | संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास |

## १४.मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र - पांढरकवडा, गडचिरोली. |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १. शासन निर्णय क्र. एसटीसी-१४८२/२९०८/प्र.क्र.९६/का-९, दि. ११ सप्टेंबर १९८७<br>२. शासन निर्णय मोप्रके-१०९५/प्र.क्र.१८५/९५/का-९, दि. १५ फेब्रुवारी १९९७ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | • महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहन चालक संदर्भातील रिक्त पदांचा अनुशेष भरुन निघावा व अवजड वाहन चालक परवानाधारक अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने राज्यात परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पांढरकवडा व गडचिरोली येथे वाहन चालक प्रशिक्षण देण्यात येत आहे.<br>• मोटार वाहन चालक प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना तांत्रिक, अतांत्रिक चालकविषयक बाबीवर सखोल प्रशिक्षण देणे.<br>• तसेच प्रशिक्षणार्थ्याकडुन वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देऊन सराव करण्यात येतो. |
| ०४ | पात्रता/निकष | • उमेदवार अनुसूचित जमातीचा असावा.<br>• वय २३ ते २५ वर्षे. उंची किमान १६३ सें.मी., शिक्षण ७ वी उत्तीर्ण.<br>• उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया वाहनचालकाचे काम करण्यास सक्षम असावा.<br>• अवजड वाहन चालविण्याचा परवाना व कमीत कमी २ वर्षाचा अवजड वाहन चालविण्याचा अनुभव. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | • अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | • अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प उपलब्ध आहे. |
| ०७ | अर्जाची किमंत असल्यास किती | • सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०८ | जोडावयाची कागदपत्रे | • अनुसूचित जमातीचा जातीचा दाखला,अवजड वाहन चालविण्याचा परवाना,इतर अनुषंगिक कागदपत्रे |
| ०९ | अपेक्षित कालावधी | • वर्षातून ५० विद्यार्थ्यांच्या २ बॅचेस घेण्यात येतात. |
| १० | योजनेसंबंधी काही तक्रार असल्यास संपर्क करावयाचे कार्यालय | • संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास |

## १५.पोलीस व सैन्य दल भरतीपूर्व प्रशिक्षण योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.<br>पोलीस व सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र -<br>नाशिक, राजुर, जव्हार, किनवट, नंदुरबार, आंबेगाव, राजुरा, देसाईगंज, मेळघाट. |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. टिएसपी-१४४९/ प्र.क्र. ५५/का-१९, दि. १२ डिसेंबर १९८९<br>२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. पोप्रकें-२००८/प्रक्र.२५८ का-५१ दि. ०४ मार्च २०१०. |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती | राज्यातील अनुसूचित जमातीच्या सुदृढ युवक / युवतींना राज्य पोलीस दल व लष्कर अथवा तत्सम विविध सुरक्षा दलात नोकरीची संधी उपलब्ध व्हावी याकरिता राज्यात एकूण ९ ठिकाणी पोलीस तथा सैन्य दल भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात येते.<br>आदिवासी प्रशिक्षणार्थींना जेवण, राहणे, गणवेश, खेळाचे साहित्य, बुट मोजे, अंथरुण, पांघरुण इत्यादी सुविधा मोफत पुरविल्या जातात. |
| ०४ | पात्रता/निकष | १. प्रशिक्षण एप्रिल ते जुलै, व्दितीय सत्र ऑगस्ट ते नोव्हेंबर व तृतीय सत्र डिसेंबर ते मार्च या कालावधीत आयोजित करण्यात येते.<br>२. एका प्रशिक्षण सत्रात १०० प्रशिक्षणार्थी असावेत.<br>३. एक सत्र केवळ युवतींसाठी असावे.<br>४. अनुसूचित जमातीचा लाभार्थी असावा.<br>४. उमेदवाराचे वय १८ ते जास्तीत जास्त २३ वर्षे<br>१. शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी पास<br>२. शारीरिक पात्रता<br>युवक उंची १६५ सें.मी. छाती ७९ सें.मी.<br>युवती उंची १५५ सें.मी. छाती ७९ सें.मी. न फुगवता |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | • अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | • अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे उपलब्ध आहे. |

<table>
<tr><td>०७</td><td>अर्जाची किंमत असल्यास किती</td><td>• सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत.</td></tr>
<tr><td>०८</td><td>जोडावयाची कागदपत्रे</td><td>• अनुसूचित जमातीचा जातीचा दाखला</td></tr>
<tr><td>०९</td><td>अपेक्षित कालावधी</td><td>
<table>
<tr><td>अर्ज सादर करणे</td><td>मार्च</td><td>जुलै</td><td>नोव्हेंबर</td></tr>
<tr><td>अर्जाची तपासणी</td><td>एप्रिल</td><td>ऑगस्ट</td><td>डिसेंबर</td></tr>
<tr><td>परिपूर्ण अर्जाची यादी अंतिम करणे</td><td>मे</td><td>सप्टेंबर</td><td>जानेवारी</td></tr>
<tr><td>निवड यादी जाहीर करणे</td><td>जुन</td><td>ऑक्टोंबर</td><td>फेब्रुवारी</td></tr>
<tr><td>प्राप्त अर्जाच्या दिनांकास ज्येष्ठतेनुसार उमेदवार निवड</td><td>जुलै</td><td>नोव्हेंबर</td><td>मार्च</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>१०</td><td>योजनेसंबंधी काही तक्रार असल्यास</td><td>संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास</td></tr>
</table>

## १६.प्रधानमंत्री आदि आदर्श ग्राम विकास योजना (PMAAGY)

| अ.क्र | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१. | सेवा पुरविणार अधिकारी/ कर्मचारी | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ०२ | कायदे /नियम / शासन निर्णय ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जाणार आहे. | ग्राम विकास आराखडा गावांच्या गरजा व क्षमतेच्या आधारावर तयार करणे व त्यास मान्यता देणे.<br>१. रस्ते (गावांतर्गत व गावांना जोडणारे)<br>२. दुरसंचार सुविधा<br>३. अंगणवाडी केंद्रे<br>४. आरोग्य उपकेंद्रे<br>५. पिण्याच्या पाण्याची सुविधा<br>६. गटारे व मल नि:सारण व्यवस्था<br>यासोबतच कौशल्य वृध्दी कार्यक्रम, समुदाय वन विकास, वनधन कार्यक्रम, जल स्त्रोतांचे संरक्षण यांचा समावेश करण्यात येईल. |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती | • आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १३.०७.२०२२ अन्वये विशेष केंद्रीय सहाय्य योजनेचे स्वरुप बदलुन आदर्श गाव संकल्पनेवर आधारित अनुसूचित जमातींचा अधिवास असलेल्या गावांचा एकात्मिक, आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी “आदि आदर्श ग्राम विकास” ही योजना मंजूर करण्यात आली आहे.<br>• केंद्र शासनाकडुन ३६०५ गावाची निवड करण्यात आलेली आहे. याकरिता निवडण्यात आलेल्या एकूण गावापैकी अंदाजे एक पंचमांश गावाचा समावेश दरवर्षी योजनेमध्ये करण्यात येईल. अविकसित तसेच आकांक्षित जिल्हयांतील गावांना प्राधान्य देण्यात येईल. निवड करण्यात आलेल्या गावांना त्यांनी सादर केलेल्या ग्रामविकास आराखडयाला केंद्र शासनाकडुन मान्यता व निधी प्राप्त झाल्यानंतर निधी वितरित करण्यात येईल.<br>• अंमलबजावणी स्तर व संबंधित स्तरावरील कार्य :-<br>१) प्रकल्पस्तर समिती, २) अपर आयुक्त, आदिवासी विकास स्तर समिती, ३) आयुक्त, आदिवासी विकास स्तर समिती, ४) राज्यस्तर समिती अशा प्रकारे समित्या असुन त्यांचे त्या-त्या स्तरावरुन विविध प्रकारची कामे निश्चित करण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ०४ | सेवा मिळविण्यासाठी नागरिकांची / गावांची पात्रता | सदर योजना वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी नसून आदर्श गाव योजनेवर आधारित घेण्यात आली आहे. केंद्र सरकारकडुन राज्यातील ज्या गावांमध्ये किमान ५०० वा ५० टक्के आदिवासी समाजाची लोकसंख्या असणे अनिवार्य आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक गावास २०.३८ लक्ष इतका निधी उपलब्ध होणार आहे. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | शासनाने निवडलेल्या ग्रामपंचायतीमार्फत कामांचे आराखडे प्रकल्प अधिकारी यांचेकडे सादर करावयाचा असुन सदर आराखडे अपर आयुक्त, कार्यालयामार्फत आयुक्त कार्यालयास सादर करण्यात आले आहेत व आयुक्त कार्यालयास प्राप्त आराखडे एकत्रित छाननी करुन शासनास मंजुरीस्तव सादर करण्यात आलेले आहेत. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे. | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प. |
| ०७ | अर्जाची किंमत असल्यास किती | निःशुल्क |
| ०८ | जोडावयाची कागदपत्रे | १) ग्रामसभा ठराव.<br>२) अंदाजित खर्च आराखडा<br>३) ज्या गावांच्या लोकसंख्येमध्ये किमान ५०० वा ५० टक्के आदिवासी समाजाची लोकसंख्या आहे याबाबत दाखला.<br>४) प्रस्तावित करण्यात येणारे काम यापूर्वी कोणत्याही योजनेतुन घेतले नसल्याबाबतचा दाखला. |
| ०९ | परिपूर्ण अर्ज प्राप्तीनंतर / त्रुटीपूर्ततेनंतर सेवा पुरविण्याचा अपेक्षित कालावधी | सदर योजना ५ वर्षासाठी मंजूर असुन योजनेत प्रत्येक वर्षी एक पंचमांश गावांचा समावेश करण्यात येत आहे. |
| १० | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करावयाचे ते कार्यालय तथा अपीलीय अधिकारी | आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक |
| ११ | अपीलीय प्राधिकारी स्तरावर प्रकरण निकाली काढण्याचा अपेक्षित कालावधी | ३० दिवस |

# १७.प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN)

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१. | सेवा पुरविणार अधिकारी/ कर्मचारी | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तसेच सेवा देणारे संबंधित विभाग |
| ०२ | थोडक्यात कार्यपध्दती | प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान या योजनेच्या अंमलबजावणीकामी खालीलप्रमाणे ११ उपक्रमांची अंमलबजावणी एकूण ९ विभागामार्फत करण्यात येते. |

| अ.क्र. | उपक्रम | योजना | विभाग |
|---|---|---|---|
| १. | पक्की घरे | आवास योजना (ग्रामीण) | ग्राम विकास |
| २. | जोड रस्ते | ग्रामसडक योजना | ग्राम विकास |
| ३ अ | नळ पाणी पुरवठा | जलजीवन मिशन | जल शक्ती |
| ३ ब | सामुदायिक पाणी पुरवठा | जलजीवन मिशन | जल शक्ती |
| ४ | मोबाईल मेडिकल युनिट | राष्ट्रीय आरोग्य अभियान | आरोग्य व कुटुंब कल्याण |
| ५ | वसतिगृह बांधकाम व सुरु करणे | समग्र शिक्षा अभियान | शालेय शिक्षण व साक्षरता |
| ६ | अंगणवाडी केंद्र बांधकाम व सुरु करणे | अंगणवाडी सेवा | महिला व बाल कल्याण |
| ७ | वनधन केंद्र उभारणे | पी.एम जनजातीय विकास अभियान | जनजाती कार्य मंत्रालय |
| ८ | बहुउद्देशीय केंद्रांचे बांधकाम (MPC) | आदिम जमाती विकास | जनजाती कार्य मंत्रालय |
| ९ | अविद्युतीकरण कुटुंबांचे उर्जीकरण | सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) | जनजाती मंत्रालय उर्जा विभाग |
| ९ अ | बहुउद्देशीय केंद्रांमध्ये सौर पथदिवे उभारणे | नवीन सौर उर्जा योजना | अपारंपारिक उर्जा स्त्रोत |
| ९ ब | ०.३ किलो वॅट सोलरग्रीड प्रणाली तरतुद | नवीन सौर उर्जा योजना | अपारंपारिक उर्जा स्त्रोत |
| १० | मोबाईल टॉवर उभारणे | सार्वत्रिक सेवा दायित्व निधी | दुरसंचार विभाग |
| ११ | व्यवसायिक शिक्षण व कौशल्य | समग्र शिक्षा अभियान व पी.एम कौशल्य विकास | शालेय शिक्षण, साक्षरता व कौशल्य विकास |

# १८. धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान

देशातील आदिवासी जमातीच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरिता धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान ही योजना दि. २ ऑक्टोबर, २०२४ पासून संपूर्ण देशभरात सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणी कामी १७ मंत्रालये व २५ प्राधान्य क्षेत्रे निश्चित करण्यात आली आहेत. ती खालीलप्रमाणे आहेत.

| S. No. | Ministry | Interventions/ (Scheme) | Beneficiary/ Intervention figure |
|---|---|---|---|
| 1 | Ministry of Rural Development (MoRD) | Pucca houses- (PMAY)- Gramin | 20 lakhs houses |
| | | Connecting Road –(PMGSY ) | 25000 km road |
| 2 | Ministry of Jal Shakti | Water Supply - Jal Jeevan Mission (JJM) | (i) Every eligible village<br>(ii) 5,000 hamlets ≤ 20HH |
| 3 | Ministry of Power | House Electrification - (Revamped Distribution Sector Scheme (RDSS)) | Every unelectrified HH and unconnected public institutions (~2.35 lakh HHs) |
| 4 | Ministry of New and Renewable Energy | Off-grid Solar. New Scheme power scheme | Every unelectrified HH and public institutions not covered through grid (MoP) |
| 5 | Ministry of Health and family Welfare | Mobile Medical units -National Health Mission (PM ABHIM) | Upto 1000 MMUs |
| | | Ayushman Card - Pradhan Mantri Jan Arogya Yojana (PMJAY)-NHA | Every eligible HH covered under the mission |
| 6 | Ministry of Petroleum & Natural Gas | LPG Connections-(PM Ujjawala Yojana) | 25 Lakhs HH |
| 7 | Ministry of Women and Child Development | Establishment of Anganwadi Centres-Poshan Abhiyan | 8000 AWCs (2000 New AWC) & 6000 upgradation to Saksham) |
| 8 | Ministry of Education | Construction of Hostels-Samagra Shiksha Abhiyan (SSA) | 1000 hostels |
| 9 | Ministry of AYUSH | Poshan Vatikas- National AYUSH Mission | 700 Poshan Vatikas |
| 10 | Department of Telecommunication | Universal Service Obligation Fund (DoT-MoC) | 5000 Villages |
| 11 | Ministry of Skill Development and Entrepreneurship | Skill India Mission (Existing scheme)/propose | Skilling centres in tribal districts |
| | | | 1000 VDVKs, Tribal Groups ,etc. |
| 12 | Ministry of Electronics & Information Technology | Tribal Digital Initiatives | As applicable |
| 13 | Ministry of Agriculture & Farmer Welfare | Promotion of sustainable agriculture -multiple Schemes of DoAFW | FRA Patta holders (~2 lakhs beneficiaries) |
| 14 | Ministry of Fisheries, Animal husbandry & Dairying (MoFAHD) | Fish culture support-Pradhan Mantri Matsya Sampada Yojana (PMMSY) | 10,000 community and 1,00,000 individual beneficiaries |
| | | Livestock rearing- National Livestock Mission | 8500 Individual /Group beneficiaries |
| 15 | Ministry of Panchayati Raj | Capacity building-Rashtriya Gram Swaraj Abhiyan (RGSA) | All Gram sabhas and concerned officers at Sub District and State level dealing with FRA |
| 16 | Ministry of Tourism | Tribal Home Stays-Swadesh Darshan | 1000 Tribal Home Stays with support of up to Rs 5 lakh per unit (for new construction), up to ₹ 3 Lakhs (renovation) and ₹ 5 lakh for village community requirement. |
| 17 | Ministry of Tribal Affairs | PMAAGY | Enhancing the scope of SCA to TD (PMAAGY) by including other interventions ## |

#100 Tribal Multi-purpose Marketing Centres, improving infrastructure of Ashram Schools, Hostels, Govt./State Tribal Residential schools, Centre of Competencies for Sickle Cell Disease (SCD) and counselling support, Support for FRA & CFR Management interventions, setting up of FRA Cells and project management funds with incentives for top performing tribal districts.

सदर योजना देशातील सुमारे ६३८४३३ गावामध्ये राबविण्यात येणार असून त्यामध्ये महाराष्ट्र राज्यातील ३२ जिल्हयातील २०६ तालुक्यातील ४९७५ गावांमध्ये राबविण्यात येणार आहे.

| क्र. | जिल्हा | तालुक्यांची संख्या | गावांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | १५ | ७६७ |
| २ | नंदुरबार | ६ | ७१७ |
| ३ | धुळे | ४ | २१३ |
| ४ | जळगाव | १२ | ११२ |
| ५ | अहिल्यानगर | ४ | ११८ |
| | **अपर आयुक्त नाशिक एकूण** | **४१** | **१९२७** |
| ६ | ठाणे | ५ | १४६ |
| ७ | पालघर | ८ | ६५४ |
| ८ | रायगड | १४ | ११३ |
| ९ | रत्नागिरी | १ | १ |
| १० | पुणे | ६ | ९९ |
| ११ | कोल्हापूर | १ | १ |
| १२ | सातारा | २ | ४ |
| १३ | सोलापूर | ३ | ६१ |
| १४ | धाराशिव | २ | ४ |
| | **अपर आयुक्त ठाणे एकूण** | **४२** | **१०८३** |
| १५ | अमरावती | ९ | ३२१ |
| १६ | अकोला | ७ | ४३ |
| १७ | बुलढाणा | ८ | ४३ |
| १८ | वाशिम | ४ | ७१ |
| १९ | हिंगोली | ५ | ८१ |
| २० | परभणी | २ | ५ |
| २१ | छ. संभाजीनगर | ४ | ११ |
| २२ | बीड | १ | २ |
| २३ | जालना | ४ | २५ |
| २४ | लातूर | २ | २ |
| २५ | नांदेड | ९ | १६९ |
| २६ | यवतमाळ | **१६** | **३६६** |
| | **अपर आयुक्त अमरावती एकूण** | ७१ | ११३९ |
| २७ | नागपूर | ११ | ५८ |
| २८ | वर्धा | ८ | ७२ |
| २९ | भंडारा | ६ | १४ |
| ३० | गोंदिया | ८ | १०४ |
| ३१ | चंद्रपूर | १५ | १६७ |
| ३२ | गडचिरोली | १२ | ४११ |
| | **अपर आयुक्त नागपूर एकूण** | **६०** | **८२६** |
| | **एकूण** | **२१४** | **४९७५** |

## १९.आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणा-या सामाजिक कार्यकर्त्यांना / सेवा संस्थांना भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण पुरस्कार योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आसेपु-१०९९/ प्र.क्र.६/का-५, दिनांक २७ जानेवारी १९९९.<br>२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आसपु-२०२४/ प्र.क्र.१०६/का-१४ दिनांक १६ जानेवारी २०२५ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती | आदिवासी क्षेत्रात आदिवासींच्या विकासाकरिता उत्स्फुर्तपणे काम करणा-या अनेक व्यक्ती व संस्था आहेत. त्यातील उल्लेखनीय काम करणा-या व्यक्ती व संस्थांची निवड करुन त्यांच्या कार्याचा जाहीर गौरव करुन असे काम करण्याकरिता इतर व्यक्ती व संस्थांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने आदिवासी सेवक / आदिवासी सेवा संस्था पुरस्कार देण्याची योजना १९८५ पासून कार्यान्वित करण्यात आली.<br>१. आदिवासी सेवक रु.१०,००१/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह , प्रशस्तीपत्रक व सत्कार<br>२. सेवा संस्था रु.२५,००१/- रोख रक्कम,स्मृतिचिन्ह प्रशस्तीपत्रक व संस्थेच्या प्रमुखाचा सत्कार. |
| ०४ | नागरिकांची पात्रता/निकष | १. अर्जदाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त असावे.<br>२. पुरस्कार मिळविणारी व्यक्ती ही पुरस्कार वर्षात खासदार / आमदार / जिल्हा परिषद अध्यक्ष अथवा कोणत्याही शासकीय अधिकार पदावर नसावा.<br>१. अर्जदार / स्वयंसेवी संस्था राजकारणापासून अलिप्त असावा.<br>२. अर्जदार व्यक्ती व संस्था यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे नोंदविलेले नसावेत किंवा शिक्षा झालेली नसावी.<br>३. अर्जदारांनी आदिवासी संस्कृती, संवर्धन,शिक्षण, अत्याचार निर्मूलन, अंधश्रध्दा निर्मूलन इ. प्रकारच्या क्षेत्रात आदिवासींच्या विकासाकरिता किमान १० वर्षे विशेष भरीव कार्य केलेले असावे. |

| | | |
|---|---|---|
| | | ४. अर्जदारांनी विहित नमून्यातील अर्ज त्यांनी केलेल्या कार्याबद्दलच्या माहितीसह (संस्थांच्या बाबतीत संस्था पब्लिक ट्रस्ट / सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टखाली पंजीबध्द असल्याबाबतची प्रमाणपत्रे, घटनेची प्रत व मागील ५ वर्षांचे अहवाल) पाठविणे आवश्यक. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे उपलब्ध आहे. |
| ०७ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०८ | जोडावयाची कागदपत्रे | १. अनुसूचित जमातीचा दाखला<br>२. फौजदारी गुन्हा नसल्याबाबतचा पोलीस स्टेशनचा दाखला |
| ०९ | अपेक्षित कालावधी | अर्ज प्राप्त करणे - ऑगस्ट अखेर<br>त्रृटीबाबत कळविणे - सप्टेंबर अखेर<br>त्रृटी पूर्ततेनंतर प्राप्त प्रस्तावाची यादी तयार करुन वैयक्तिक माहिती तपशील तयार करणे - ऑक्टोंबर<br>अद्ययावत यादी शासनास सादर करणे - १५ नोव्हेंबर<br>अंतिम पूर्तता - २९ नोव्हेंबर |
| १० | यासंबधी काही तक्रार असल्यास त्यासाठी संबधित कार्यालय | संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास |

## २०. राज्यातील आदिवासी क्षेत्रामध्ये कन्यादान योजना राबविणे.

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. सावियो-२००३/प्र.क्र.१७९/का-८, दिनांक ३ मार्च २००४<br>२. आदिवासी विकास विभाग, शासन शासन शुध्दीपत्र क्र. सावियो- २००३/प्र.क्र.१७९/का-८, दिनांक १८ फेब्रुवारी २००९.<br>३. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. अविवि-०१२४/प्र.क्र.११/का-८, दिनांक १५ मार्च २०२४. |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती | लग्न समारंभाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर होणारा खर्च कमी करण्यासाठी आणि विवाह सोहळयातील अनुचित प्रथांना आळा घालण्यासाठी सामूहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन देण्यात येते.<br>१. रु. २५,०००/-इतकी अनुदानाची रक्कम थेट लाभार्थी हस्तांतरण डी.बी.टी.द्वारे खात्यावर जमा करण्यात येते.<br>२. सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यासाठी सेवाभावी संस्था/यंत्रणा यांना प्रत्येक जोडप्याकरिता २५००/- देण्यात येतात. |
| ०४ | पात्रता/निकष | १. वर किंवा वधू अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक आहे.<br>२. वर व वधूचे वय विवाहाच्या दिनांकास विवाह नोंदणीनुसार असणे आवश्यक.<br>३. वर आणि वधूचा प्रथम विवाह असणे आवश्यक व त्यांना अपत्य असता कामा नये.<br>४. जिल्हा माहिती व जनसंपर्क यंत्रणेकडुन योजनेची प्रसिध्दी देणे. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे उपलब्ध आहे. |
| ०७ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ०८ | जोडावयाची कागदपत्रे | १. अनुसूचित जमातीचा जातीचा दाखला<br>२. वर किंवा वधूचा वयाचा सक्षम प्राधिका-याचा दाखला<br>३. हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र<br>४. सक्षम अधिका-यांचा रहिवासी दाखला |
| ०९ | अपेक्षित कालावधी | अर्जाची छाननी - जून अखेर<br>अर्जाची यादी अंतिम करणे - ऑगस्ट अखेर<br>प्रत्यक्ष लाभ देणे - नोव्हेंबर अखेर |
| १० | यासंबधी काही तक्रार असल्यास त्यासाठी संबधित कार्यालय | संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास |

## २१.भूमिहीन दारिद्रय रेषेखालील आदिवासीचे सबळीकरण व स्वाभिमान योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. भुवाये-२०१८/प्र.क्र.१२७/का-१४, दिनांक २८ जुलै २०२१. |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | दारिद्रय रेषेखालील भूमिहीन कुटूंबाना उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे रोजगार हमी योजना किंवा खाजगी व्यक्तीकडे मजुरी करावी लागते व रोजगारनिमित्त त्यांचे परराज्यात स्थलांतर होते हे टाळण्यासाठी भूमिहीन कुटूंबास जमीन देण्याची योजना १०० टक्के शासन अनुदानित देण्यात येते..<br>❖ लाभार्थ्यास द्यावयाची **जमीन** जिरायत असेल तर ४ एकर<br>किंवा<br>जमीन बागायत असेल तर २ एकर बागायत अनुदानावर देण्यात येते.<br>❖ **जमिनीची** विक्री अथवा हस्तांतरण करता येणार नाही.<br>❖ जिरायती **जमीन** प्रती एकर ५ लाख किंवा रेडीरेकनरच्या दुप्पट या पैकी जो दर कमी असेल तो.<br>❖ बागायती **जमीन** प्रती एकर ८ लाख किंवा रेडीरेकनरच्या दुप्पट या पैकी जो दर कमी असेल तो. |
| ०४ | पात्रता/निकष | १) पात्र लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील भूमिहीन असावा.<br>**लाभार्थ्यांमध्ये प्राधान्य क्रम खालील प्रमाणे आहे.**<br>❖ दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन आदिवासी परित्यक्त्या स्त्रिया.<br>❖ दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन आदिवासी विधवा स्त्रिया.<br>❖ भूमिहीन कुमारी माता.<br>❖ भूमिहीन आदिम जमाती.<br>❖ भूमिहीन पारधी.<br>२) लाभार्थीचे वय किमान १८ व कमाल ६० वर्षे असावे.<br>३) शासनाने ज्यांना गायरान, सिलींगच्या जमिनीचे वाटप केले आहे तसेच वैयक्तिक वनहक्क प्राप्त झालेल्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.<br>४) ज्या आदिवासी व्यक्तीच्या विरुध्द जमीनी अतिक्रमणाबाबतची प्रकरणे महसुल अधिका-याकडे प्रलंबित आहे त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.<br>५) लाभार्थ्यास जमिनीची विक्री अथवा हस्तांतरण करता येणार नाही |

| | | |
|---|---|---|
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | • अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | • अर्ज नमुना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे उपलब्ध आहे. |
| ०७ | अर्जाची किंमत असल्यास किती | • सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०८ | जोडावयाची कागदपत्रे | १. अनुसूचित जमातीचा जातीचा दाखला<br>२. दारिद्रय रेषेखालील दाखला<br>३ वयाचा दाखला<br>४. लाभार्थी सदर गावाचा रहिवासी असावा. |
| ०९ | अपेक्षित कालावधी | जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर ६ महिने. |
| १० | यासंबंधी काही तक्रार असल्यास त्यासाठी संबधित कार्यालय | संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास |

## २२.ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम (राज्यस्तर / जिल्हास्तर)

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आवसु-२००६/प्र.क्र.७२/का-१४, दिनांक २६ जुन २००७<br>२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. ठबायो-२०२१/प्र.क्र.१५/का.९ दिनांक : ०३.०२.२०२३ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती | संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी ग्रामीण / नागरी भागातील अनुसूचित आदिवासी क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र, माडा / मिनीमाडा क्षेत्र, प्रस्तावित माडा / मिनीमाडा क्षेत्र, तसेच आदिवासी उपयोजना बाहय क्षेत्रातील ५० टक्के पेक्षा जास्त आदिवासींची लोकसंख्या असलेल्या वस्त्या / पाडे / गावे यांनी आवश्यकतेनुसार कामे सुचवावीत.<br>१. सदर कामे आवश्यक असल्याची खात्री करुन व तसा प्रस्ताव तयार करुन प्रकल्प अधिकारी यांनी अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडे सादर करावा.<br>२. जी कामे घ्यावयाची असतील ती कामे ज्या प्रशासकीय विभागाशी निगडीत असतील त्या विभागाने ठरवून दिलेले निकष व मानके यांचे अनुपालन होणे आवश्यक आहे.<br>३. ग्रामपंचायतींनी सुचविलेल्या कामांना अग्रक्रम देण्यात यावा.<br>सदर योजनेतंर्गत मुख्य वस्तीपासुन जोडरस्ते, सिमेंट कॉक्रिट / डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते, शाळेचे कंपाऊड, पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे, जुन्या विहिरीची दुरुस्ती, बंद गटार बांधणे, आदिवासी वस्तीचे विद्युतीकरण, समाजमंदिर, सार्वजनिक शौचालय, स्मशानभूमी बांधकाम, नदीकाठ संरक्षण भिंत, घाट बांधकाम, नदीकाठची संरक्षण भिंत, बस थांबा / प्रवासी निवारा शेड बांधकाम, रस्त्यांवर पेव्हींग ब्लॉक बसविणे, व्यायामशाळा, वाचनालय, ग्रंथालय/अभ्यासिका, बगीचे व सुशोभिकरण करणे, तीर्थक्षेत्र व पर्यटन विकास, माता बालसंगोपन केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय / ग्रामसचिवालय इ. कामे.<br>**आर्थिक निकष-**<br>आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र. ठबायो-२०२१/प्र.क्र.१५/ का.९ दिनांक : ०३.०२.२०२३ अन्वये आदिवासी वस्ती /वाडे/पाडे/समूह (Cluster) यामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात खालील प्रमाणे कामांसाठी वित्तीय मर्यादा विहीत करण्यात आली आहे. |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>आदिवासी लोकसंख्या</th><th>कामासाठी आर्थिक मर्यादा</th></tr>
<tr><td>१</td><td>३००० पेक्षा जास्त</td><td>रु. १००.०० लक्ष</td></tr>
<tr><td>२</td><td>१५०० ते ३०००</td><td>रु. ७५.०० लक्ष</td></tr>
<tr><td>३</td><td>१००० ते १४९९</td><td>रु. ५०.०० लक्ष</td></tr>
<tr><td>४</td><td>५०० ते ९९९</td><td>रु. ४०.०० लक्ष</td></tr>
<tr><td>५</td><td>१०१ ते ४९९</td><td>रु. २०.०० लक्ष</td></tr>
<tr><td>६</td><td>१ ते १००</td><td>रु. ५.०० लक्ष</td></tr>
</table>
सदर वित्तीय मर्यादेत ५ वर्षापर्यंत संबंधित वस्ती / वाडे / पाडे / समुहामध्ये एक किंवा एकापेक्षा अधिक कामे घेता येतील. उपरोक्त आर्थिक मर्यादा ही कामे घेतल्यापासून ५ वर्षामधील ज्या वर्षी सदर कामे पूर्ण केली त्या वर्षापासून पुढील ५ वर्षानंतर सदर ठिकाणी पुनश्च अनुज्ञेय होतील. या योजनेंतर्गत शासनास प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना त्या-त्या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार मान्यता देण्यात येईल. तथापि आवश्यकतेनुसार सदर ५ वर्षांची मर्यादा शिथिल करण्याचे अधिकार शासनास राहतील.
</td>
</tr>
<tr>
<td>०४</td>
<td>पात्रता / निकष / अटी व शर्ती</td>
<td>१. ज्या ठिकाणी अद्याप पायाभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत अशा वस्ती / वाडे / पाडे/समुह (Cluster) अशा ठिकाणांचा प्राधान्याने विचार होतो.<br>२. इतर योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून घेण्यात आलेली / येणारी कामे वगळून या योजनेमधून विकासात्मक कामे घेण्यात येतात.<br>३. नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकडे दिलेला निधी हा साधारणत: दोन आर्थिक वर्षात खर्च करण्याची अनुमती असते. त्यानुसार मंजूर करण्यात आलेल्या कामांवर त्यापुढील आर्थिक वर्षापर्यंत खर्च करण्याची मुभा राहील.</td>
</tr>
<tr>
<td>०५</td>
<td>जोडावयाची कागदपत्रे</td>
<td>१. प्रस्तावित कामाचे मूळ अंदाजपत्रक<br>२. ग्रामपंचायत ठराव नक्कल मूळ प्रत.<br>३. लोक संख्येबाबतचा दाखला, तहसीलदार यांची स्वाक्षरीसह<br>४. इतर अनुषंगिक कागदपत्रे</td>
</tr>
<tr>
<td>०६</td>
<td>अपेक्षित कालावधी</td>
<td>२ महिने</td>
</tr>
<tr>
<td>०७</td>
<td>योजनेसंबंधी तक्रार असल्यास संपर्क करावयाचे कार्यालय</td>
<td>संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास</td>
</tr>
</table>

## २३.शबरी आदिवासी घरकुल योजना.(शहरी/ग्रामीण)

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | **१. राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण कक्ष**<br>**२. संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प** |
| ०२ | कायदे/ नियम/शासन निर्णय ज्या | १. शासन निर्णय क्रमांक २०१२ घरकुल /प्र.क्र.३८ (भाग-१) का.१७ दि.२८ मार्च २०१३ व १५ मार्च २०१६<br>२. शासन निर्णय क्रमांक आ.वि.वि. /प्र.क्र.३० का.०८ दि.११ जानेवारी २०२४ |
| ०३. | थोडक्यात कार्यपध्दती | राज्यातील बेघर किंवा ज्यांची घरे कुडा - मातीची आहेत अशा आदिवासी लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करुन देणे.<br>अनुदान- ग्रामीण क्षेत्र-१,२०,०००/-<br>शहरी क्षेत्र -२,५०,०००/- |
| ०४ | नागरिकांची पात्रता/ निकष | १. अनुसूचित जमाती संवर्गातील असावा<br>२. राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्ष असावे.<br>३. स्वत:चे किंवा कुटुंबाचे पक्के घर नसावे.<br>४. कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा<br>अ. ग्रामीण क्षेत्र - रु.१.२० लक्ष<br>ब. नगरपालिका क्षेत्र - रु.३.०० लाख<br>क.महानगरपालिका व मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्र - रु.३.०० लाख<br>५. शासनाच्या अन्य गृहनिर्माण योजनेव्दारे घराचा लाभ घेतलेला नसावा. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय. |
| ०६ | अर्ज कुठे उपलब्ध आहे | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय. |
| ०७ | अर्जाची किंमत असल्यास किती | अर्ज विनामूल्य आहे |

| | | |
|---|---|---|
| ०८ | जोडावयाची कागदपत्रे | १) ७/१२ चा उतारा, मालमत्ता नोंदपत्र (प्रॉपर्टी रजिस्टर्ड कार्ड) ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतारा यापैकी एक.<br>२) घरपट्टी, पाणीपट्टी, विद्युत बील या कागदपत्रांपैकी एक.<br>३) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत<br>४) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला<br>५) अतिरिक्त दाखले : खाली नमूद केलेली कागदपत्रे/दाखले पुरावे म्हणून ग्राह्य धरण्यात येतील :-<br>अ) दिनांक १.१.१९९५ च्या किंवा मतदार यादीतील नावांचा उतारा<br>ब) निवडणूक मतदार ओळखपत्र<br>क) रेशनकार्ड<br>ड) सरपंच/तलाठ्याचा दाखला<br>इ)महानगरपालिका/नगरपालिकेतील मालमत्ता कर भरल्याच्या पावतीची प्रत |
| ०९ | अपेक्षित कालावधी | १ महिना |
| १० | योजनेसंबंधी काही तक्रार असल्यास | संबंधित अपर आयुक्त , आदिवासी विकास |

## २४. भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना-टप्पा १

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक बाल विकास सेवा योजना |
| २ | कायदे शासन निर्णय/नियम/ | शासन निर्णय दिनांक १८.११.२०१५, दि.०२.०८.२०१६ व दि.०५.०८.२०१६. |
| ३ | थोडक्यात कार्यपद्धती | या योजनेंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार स्त्री गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून बाळंतपणापर्यंत तसेच स्तनदा मातांना पाहिले सहा महिने एक वेळ दिला जातो. एक वेळच्या पूर्ण आहारामध्ये- चपाती/भाकरी, भात, कडधान्ये-डाळ, सोया दुध (साखरेसह), शेंगदाणा लाडू,(साखरेसह), अंडी/ केळी/नाचणी हलवा, फळे, हिरव्या पालेभाज्या, खाद्यतेल, गुळ / साखर, आयोडीनयुक्त मीठ, मसाला इत्यादींचा समावेश असतो. |
| ४ | पात्रता | अंगणवाडी,मिनी अंगणवाडीकरिता क्षेत्रातील नोंदणी झालेल्या गरोदर स्त्रिया व स्तनदा माता व्यतिरिक्त इतर ठिकाणाहून त्या अंगणवाडी क्षेत्रात आलेल्या गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांनाही या योजनेचा लाभ देण्यात येतो. |
| ५ | योजनेसंबंधी काही तक्रार असल्यास संपर्क करावयाचे कार्यालय | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय |

# २५. भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना-टप्पा २

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी ,एकात्मिक बाल विकास सेवा योजना |
| २ | कायदे शासन निर्णय/नियम/ | शासन निर्णय क्र२०१-आविवि. २०१६.प्र.क्र/का/०८०५ दि. ०५.०८.२०१६. |
| ३ | थोडक्यात कार्यपद्धती | अनूसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना अंडी/केळी/स्थानिक फळे इत्यादीसह अतिरिक्त आहार पुरविण्यासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा-२ सुरू करण्यात आला आहे.याअंतर्गत ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना आठवडयातून ४ वेळा प्रति दिन मुलांना शाकाहारामध्ये २ केळी व मांसाहारामध्ये एक उकडलेले अंडे असे महिन्यातून १६ दिवस एक वेळचा अतिरिक्त आहार देण्यात येतो. |
| ४ | पात्रता | अंगणवाडी मिनी अंगणवाडीकरीता क्षेत्रातील /नोंदणी झालेल्या बालकांना या योजनेचा लाभ देण्यात येईल |
| ५ | योजनासंबंधी काही तक्रार असल्यास संपर्क करावयाचे कार्यालय. | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प |

## २६. अनुसूचित क्षेत्रातील ( पेसा ) ग्रामपंचायतींना ५ % अबंध निधी योजना.

मा. राज्यपाल महोदयांच्या दि.३०.१०.२०१४ च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने आदिवासी उपयोजनेंतर्गत प्राप्त होणा-या एकूण नियतव्ययाच्या ५ टक्के निधी अनुसुचित क्षेत्रातील १३ जिल्हयातील ५९ तालुक्यातील ३००५ ग्रामपंचायतीनां व त्या अंतर्गत गावे/वाडया/वस्त्या/पाडे (८४५६ गावे) यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वितरित करण्याचा शासन निर्णय दिनांक २१.०४.२०१५ अन्वये घेण्यात आला. मा. राज्यपाल महोदयांनी दिनांक १३.०४.२०१६ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार सन २०१६-१७ पासून अनुसूचित क्षेत्रातील ग्राम पंचायतींना त्यांच्या एकूण लोकसंख्येऐवजी अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याबाबत सुधारणा केली आहे.

**५ % प्राप्त थेट निधी विनियोजनाची क्षेत्रे :-**

(अ) पायाभूत सुविधा :

(ब) वन हक्क अधिनियम (FRA) व पेसा (PESA) कायद्याची अंमलबजावणीः

(क) आरोग्य, स्वच्छता, शिक्षणः

(ड) वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजीविका

२. सन २०१५ पासून २०२४ पर्यंत अनुसूचित क्षेत्रातील पेसा गावांना रु.१९३७ कोटी निधी पेसा गावांच्या "ग्रामसभा कोष" खात्यांमध्ये जमा करण्यात आले आहेत. “पेसा ५% थेट निधी योजनेने” पेसा ग्रामसभांना स्वतंत्र ओळख दिली आहे. पेसा ग्रामसभा त्यांच्या स्थानिक गरजा आणि योजनेची मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन या योजनेसाठी स्वतंत्रपणे त्यांचा विकास आराखडा तयार करतात.

३. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी आदिवासी विकास विभागाने ग्रामसभा कोष समित्यांना एकूण रू. २६९.५६ कोटी निधी उपलब्ध करून दिलेला आहे. या निधीमधून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी मागील वर्षातील शिल्लक कामांसह एकूण ८५३०९ कामांपैकी ४६०३० इतकी कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित कामे व निधी चालू वर्षाच्या आराखड्यात समाविष्ट करण्यात आली आहेत.

४. सन २०२४-२५ मध्ये माहे ऑक्टोबर, २०२४ अखेरपर्यंत ४०.८७ कोटी निधी ग्रामसभा कोष खात्यांना वितरित करण्यात आलेला आहे. सन २०२४-२५ मध्ये एकूण ६०११४ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

## २७. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक

"रजि. ऑफीस" आदिवासी विकास भवन", २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रारोड,

नाशिक-४२२००२

दुरध्वनी (०२५३) २५७१७८२, २३११९१५

Website-www.mahatdc.in Mail-mectdonak@gmail.com

## प्रस्तावना

### महामंडळाची स्थापना व उद्देश :-

- महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास महामंडळाची सन १९७२ मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये स्थापना केली आहे.

- आदिवासी शेतकरी, आदिवासी कारागीर आणि आदिवासी भुमिहीन मजुर यांची आर्थिक पिळवणुक नाहीशी करण्यासाठी प्रभावी साधन म्हणून कार्य करणे.
- आदिवासींच्या आर्थिक विकास संवर्धनासाठी प्रत्यक्ष साहाय्याच्या योजना हाती घेणे,

**संचालक मंडळ संरचना**

- महामंडळाचे पदसिध्द अध्यक्ष हे मा. मंत्री, आदिवासी विकास विभाग.
- महामंडळाचे उपाध्यक्ष शासन नियुक्त असतात.
- शासकीय संचालक सदस्य २२ व निर्वाचित संचालक सदस्य १५ असे एकुण सदस्य संख्या ३७ आहे.

**आदिवासी विकास महामंडळ हे खालील मुख्य दोन उद्दिष्टांवर कार्य करते.**

- आदिवासी शेतकरी, आदिवासी कारागीर आणि आदिवासी भुमिहीन मजुर यांची आर्थिक पिळवणूक नाहीशी करण्यासाठी प्रभावी साधन म्हणून कार्य करणे,
- आदिवासींच्या आर्थिक विकास संवर्धनासाठी प्रत्यक्ष सहाय्याच्या योजना हाती घेणे. वरील उद्दिष्टांच्या परिपूर्ततेच्या दृष्टीने महामंडळ विविध योजना राबवित आहे. आदिवासी विकास महामंडळाचे ९३८ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था या सभासद असुन सदर संस्थेमार्फत निवडुन दिलेले प्रतिनिधी हे महामंडळाचे संचालक आहेत. तसेच मा. मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई हे महामंडळाचे अध्यक्ष असतात.

**आदिवासी विकास महामंडळाच्या योजना :-**

१. आधारभूत किंमत खरेदी योजना

२. केंद्रशासनाची आधारभुत किंमत (MSP for MFP) गौणवनउपज खरेदी-विक्री योजना

३. ऐच्छिक हिरडा खरेदी

# कार्यालयाची संरचना

## व्यवस्थापकीय संचालक

- १. महाव्यवस्थापक (प्रशासन)
- २. महाव्यवस्थापक (विपणन)
- ३. महाव्यवस्थापक (वित्त)
- ४. महाव्यवस्थापक (गोंडवन)

### १.प्रा.का.नाशिक
उप प्रा.का.
१.पेठ
२.सुरगाणा
३.कळवण
४.दिंडोरी
५.घोटी

### २.जव्हार
उप प्रा.का.
१.जव्हार
२.मोखाडा
३.मनोर
४.शहापुर
५.कासा

### ३.जुन्नर
उप प्रा.का.
१.घोडेगाव
२.राजुर

### ४.नंदुरबार
उप प्रा.का.
१.नंदुरबार
२.नवापुर
३.पिंपळनेर
४.शहादा
५.तळोदा
६.धडगाव
७.यावल

### ५.धारणी
उप प्रा.का.
१.धारणी
२.चिखलदरा

### ६.यवतमाळ
उप प्रा.का.
१.पांढरकवडा
२.किनवट
३.कळंब

### ७.चंद्रपुर
उप प्रा.का.
१.चिमुर
२.गोडपिंपरी

### ८.भंडारा
उप प्रा.का.
१.देवरी
२.नवेगावबांध
३.रामटेक

### ९.गडचिरोली
उप प्रा.का.
१.कुरखेडा
२.घोट
३.धानोरा
४.आरमोरी
५.कोरची

### १०.उपप्रा.का.अहेरी (उच्च श्रेणी)

**१.आधारभुत किंमत खरेदी योजना :-**

ही केंद्र शासनाची योजना असुन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील शासन निर्णयान्वये आदिवासी उपयोजना क्षेत्रात महामंडळामार्फत सन २०००-२००१ पासून राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या हमीदराचा आदिवासी कष्टकऱ्यांना लाभ मिळावा या उद्देशाने दरवर्षी आदिवासी उपयोजना क्षेत्रात धान व भरडधान्याची खरेदी करण्यात येते.

**२.केंद्रशासनाची किमान आधारभुत किंमत (MSP for MFP) गौणवनउपज योजना -**

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी बांधवानी गोळा केलेल्या गौणवनउपजास योग्य मोबदला मिळुन त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावणे कामी केंद्रशासनाच्या जनजाती कल्याण मंत्रालय नवी दिल्ली यांनी सन २०१३-१४ पासुन किमान आधारभूत दरावर आधारित (MSP for MFP) गौणवनउपज योजना सुरु केली आहे.

केंद्र शासनाच्या जनजातीकल्याण मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील (FNO.२/१९/२०१३- Cp&R Govt.of India (MOTA) Date-३/०१/२०१४ च्या संदर्भातील मार्गदर्शक सुचनानुसार महामंडळ हंगाम-२०१४-१५ पासुन राज्यशासनाची मुख्य अभिकर्ता संस्था म्हणून केंद्रशासनाची आधारभूत दरावर आधारीत गौणवनउपज योजना १६ जिल्हयांमध्ये राबवित आहे. सदर योजनेअंतर्गत केंद्रशासनाने जाहीर केलेल्या आधारभूत दरानुसार ८७ गौणवनउपजची खरेदी महामंडळाचे प्रादेशिक कार्यालया अंतर्गत करण्यात येत आहे.

दि.१६.०४.२०२० रोजी मा. मंत्री आदिवासी विकास विभाग तथा अध्यक्ष आदिवासी विकास महामंडळ यांच्या मान्यतेने आदिवासी विकास महामंडळाकडील केंद्रशासनाच्या किमान आधारभूत दरावरील (MSP tor MFP) गौणवनउपज खरेदी योजनेतील प्राप्त रक्कम रु.५ कोटी पैकी रक्कम रु. २,५५,००,००० लक्ष इतका निधी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक वनधन केंद्रामार्फत गौणवनउपज खरेदी करणेकामी वर्ग करण्यात आलेला आहे. त्याअन्वये सद्यस्थितीत प्रधानमंत्री वनधन योजने अंतर्गत वनधन केंद्रामार्फत गौणवनउपजची खरेदी सुरु आहे.

## ३. ऐच्छिक हिरडा खरेदी :-

गौण वनौपज खरेदी बाबत,पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (पेसा) १९९६ अंतर्गत १९९७ चा महाराष्ट्र अधियिम ४६ अन्वये शासकीय जोवरील ३३ गौणवनोपजाची मालकी ग्रामपंचायतीकडे

हस्तांतरीत झाली. त्यामुळे सन २००८ पासून महामंडळ गौण वनौपज खरेदीसाठी ग्रामविकास खात्याच्या परवानगीने गौण वनौपज खरेदी करत होते, परंतु ग्रामविकास विभागाने त्यांचेकडील दिनांक २३ सप्टेंबर २०११ अन्वये महामंडळास गौण वनौपज खरेदी करणेस नाकारले आहे. तथापि दि. २०/१२/२०२३ रोजी संपन्न झालेल्या मा. संचालक मंडळाच्या सभेमध्ये महामंडळामार्फत ऐच्छिक बाळहिरडा खरेदी करणेबाबत ठराव मंजूर झालेला आहे. त्यानुसार हंगाम २०२३-२०२४ मध्ये महामंडळामार्फत पुणे व अहिल्यानगर जिल्हयांमध्ये रु. १७०/- प्रति किलो या दराने ८१० लाभाथ्यांकडुन ३२०.०० क्वि. बाळहिरडा खरेदी करण्यात आलेला आहे. यामुळे सदर जिल्हयातील लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. खरेदी करण्यात आलेला बाळहिरडयापैकी ५ क्वि, बाळहिरडा रु. १७१/- प्रति किलो या दराने में. दगडु तेली चांदवडकर ट्रेडिंग कंपनी, नाशिक यांना विक्री करण्यात आलेला आहे. उर्वरित बाळहिरडा विक्री करणेची कार्यवाही सुरु आहे.

## भागभांडवलाचा तपशील

महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रुपये २००,०० कोटी इतके आहे. त्यापैकी केंद्र शासनाकडून ४९% व राज्य शासनाकडून ५१% भाग भांडवल प्राप्त होणे अपेक्षित आहे. शासन निर्णय आविम-२००४/ प्र.क्र.१५/ का.३ दि. २४.०८.२००४ नुसार महामंडळ स्वयंपूर्ण होणेसाठी प्रतिवर्ष रु.२०/- कोटी राज्य शासनाच्या भागभांडवलाचा हिस्सा देण्याचा धोरणात्मक निर्णय झालेला आहे. केंद्र व राज्य शासनाचे दि.३१.०३.२०२४ अखेर प्राप्त भागभांडवल पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | प्रमाण | अधिकृत भागभांडवल | अहवाल वर्षापर्यंत प्रत्यक्ष भागभांडवल | केंद्र शासना कडून अप्राप्त भागभांडवल | राज्य शासनाकडून जादा प्राप्त भागभांडवल (कृपया टिप वाचावी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | केंद्र शासन | ४९% | ९८००.०० | १२१४.५७ | (-)८५८५.४३ | ०.०० |
| २. | राज्य शासन | ५१% | १०२००.०० | १३३४०.८७ | ०.०० | ९३.६६ |
| ३. | आदि.वि.का. संस्थेचे भागभांडवल | -- | -- | १.२५ | ०.०० | ०.०० |
| | **एकूण** | **--** | **२००००.००** | **१४५५६.६९** | **८५८५.४३** | **९३.६६** |

टीप– मुख्य कार्यालयाचे पत्र क्र. आविम/प्रशा/शासन पत्र/४०६४/१७ दिनांक. ८ मार्च, २०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.२००/- कोटी वरून रु.५००/- कोटी पर्यंत वाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेत आलेला आहे. त्यास अद्याप राज्य शासनाकडून मान्यता नसल्याने राज्य शासनाचा जादा हिस्सा प्राप्त दिसत आहे.

महामंडळाच्या स्थापनेपासून प्राप्त भागभांडवलाचा तपशील परिशिष्ट–ब मध्ये सोबत जोडला आहे.

## व्यवस्थापकीय अनुदानाचा तपशील

महामंडळाची स्थापना शासन निर्णय क्रमांक. STW १३७१/१०५६८१-२ सचिवालय अनेक्स, मुंबई-३२ दि. १४/०१/१९७२ अन्वये झालेली आहे. महामंडळाची स्थापना सहकार कायदा १९६० अन्वये दि.२२ मार्च १९७२ रोजी झालेली आहे. महामंडळाची नोंदणी क्र.पी.एन/जी.एन.एल. (ए) दि.२२/०३/१९७२ आहे.

शासन निर्णय क्र. TDC१०७७/१३७३३/XXIV(II) Dtd.६" Feb.१९८२ अन्वये महामंडळाचे कर्मचा-यांचे वेतन, भत्ते व प्रशासकीय खर्चाकरीता १००% व्यवस्थापकीय अनुदान देण्याचा निर्णय झालेला आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाने पत्र क्र.आविम/विप/प्रशा/सभा/ २१५३/२१ दि.१८/१०/२०२१ अन्वये महामंडळास शासनाकडून मिळणा-या व्यवस्थापकीय अनुदानाची मुदत सन २०३२ पर्यंत वाढवून मिळणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता त्यानुसार आविम-२०२१/प्र.क्र.१५१/का.३ दि. ०३/०१/२०२४ अन्वये महामंडळास शासनाने व्यवस्थापकीय अनुदानाची सन २०२७ पर्यंत वाढवून दिलेली आहे.

-----------------------------------------------------

# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती

**महामंडळ निर्मिती :-**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/ का-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये महामंडळाची निर्मिती करण्यांत आलेली आहे.

**महामंडळाची स्थापना :-**

महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे. तसेच शबरी महामंडळाचा CIN No. U74210MH1999SGC118747 असा आहे.

**महामंडळाचा उद्देश :-**

अ) अनुसुचित जमातीच्या व्यक्तीच्या आर्थिक विकासासाठी व कल्याणासाठी स्वत:च्या जबाबदारीवर किंवा सरकार, संवैधानिक संस्था, कंपन्या, भागीदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने किंवा अशा संघटना, अभिकरणे यांच्या मार्फत कृषी उद्योग, लघु उद्योग, वाहतुक, वैद्यकीय, अभियांत्रिकी सारखा इतर धंदा/व्यवसाय, व्यापार किंवा कार्यालय यांच्या माध्यामातुन योजना आखणे, प्रचलित करणे. मदत करणे, सल्ला देणे, सहाय्य करणे, वित्तीय सहाय्य देणे, संरक्षण देणे आणि विविध उपक्रम हाती घेणे.

ब) आर्थिक स्थिती / पध्दती आणि उत्पादन निर्मिती, व्यवस्थापन आणि विपणन यांच्या तंत्राचा विकास करण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यात अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस समर्थ बनविण्यासाठी कामधंदा, व्यवसाय, व्यापार किंवा कार्य चालु करण्यासाठी भांडवल कर्ज मिळविण्याची साधने सामुग्री आणि तांत्रिक व्यवस्थापकीय साहाय्य देण्याची तरतूद करणे.

क) वरील व्यतिरिक्त आदिवासींच्या आर्थिक उन्नतीसाठी योग्य ते आवश्यक वाटणारे इतर कार्य करणे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत केंद्र शासन व राज्य शासन यांचे निधीतून विविध उपजीविका वृद्धीचे योजना राबविण्यात येतात .

**Special Central Assistance (SCA)**

| Sr No | Year | Project Name | Received (₹ Lakhs) | Expenditure (₹ Lakhs) | Balance (₹ Lakhs) | Beneficiary Target | Beneficiary Covered |
|---|---|---|---|---|---|---|---|
| A | | Special Central Assistance (SCA) | | | | | |
| 1 | 2018-19 | Organizing FPOs of 15000 farmers for processing, distribution, branding and retailing. | 2440.00 | 1181.99 | 1258.01 | 15000 | 19508 |
| 2 | 2019-20 | | 2440.00 | 2217.99 | 222.00 | | |
| 3 | 2019-20 | Tata Trusts (Collective for Livelihoods initiatives improving HH incomes through layered agriculture-based livelihoods intervention (6000 HHs, Nandurbar) | 620.00 | 620.00 | 0.00 | 3000 | 3000 |
| 4 | 2019-20 | CCD NGO- formation of FPO(s) in Gadchiroli and Yavatmal so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization | 500 | 500.00 | 0.00 | 5000 | 3327 |
| | | Sub Total | **6000** | **4519.986** | **1480.014** | **23000** | **25835** |
| B | | **CCD/PVTGs** | | | | | |
| 1 | 2019-20 | EAGL-Goat Rearing intervention for katkari tribes | 527.00 | 527.00 | 0.00 | 1430 | 1099 |
| | 2020-21 | | 424.66 | 369.3832 | 55.2768 | | |
| | | **Sub Total** | **951.7** | **896.38** | **55.277** | **1430** | **1099** |

**Provision under Article 275(1)**

| Sr. No. | Year | Project Name | Received (₹ Lakhs) | Expenditure (₹ Lakhs) | Balance (₹ Lakhs) | Bene. Target | Bene Covered |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **A** | | **Provision under Article 275(1)** | | | | | |
| 1 | 2018-19 | Organizing FPOs of 15000 farmers for processing, distribution, branding and retailing. | 2440 | 2032.91 | 407.095 | 15000 | 19846 |
| 2 | 2019-20 | | 1440 | 1127.86 | 312.14 | | |
| 3 | 2019-20 | BAIF -Seed Bank for indigenous seed conservation, marketing production, marketing and sale (PO ITDP Rajur) | 50.75 | 50.75 | 0 | 1050 | 1050 |
| 4 | 2020-21 | | 50 | 50 | 0.0 | | |
| 5 | 2019-20 | Bharat Rural Livelihoods foundation- Improving livelihood conditions by augmenting land and water resources, sustainable Agri practices, enhancing | 100 | 100 | 0 | 15000 | 15000 |
| 6 | 2020-21 | | 100 | 100 | 0.00 | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | livestock productivity, capacity building of GPs for IFR/CFR and convergence of government | | | | | |
| | | **Sub Total** | **4180.750** | **3461.5199** | **719.2301** | **31050** | **35896** |
| | | **Grand Total** | **11132.41** | **8767.3157** | **2365.09427** | **55480** | **62830** |

सन २०२४ करिता केंद्र शासनाकडून २५-Article २७५(१) अंतर्गत Project Apprisal Committee कडून खालीलप्रमाणे योजना मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

| Sr. No. | Scheme | Amt (Lakh) | Target |
|---|---|---|---|
| 1 | Shabari Adi Paryatan Scheme | 1375.00 | 250 Home Stays (25 Villages) |
| 2 | Organizing FPOs for processing distribution, branding and retailing | 1000.00 | 15 FPOs |
| | **Total** | **2375.00** | |

राज्य शासनाकडून प्राप्त शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची प्रगती खालीलप्रमाणे

| Sr No | Project Name | Amount Received (₹ Lakhs) | Expenditure (₹ Lakhs) | Amount unspent (₹ Lakhs) | Beneficiary Target | Beneficiary Covered |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Eklavya Kushal Skill Development Scheme | 2197.7636 | 0.00 | 2197.7636 | 13800 | 650 |
| 2 | Pilot Dairy Development Scheme Through JLGs | 25381.07 | 6066.3344 | 19314.7356 | 28600 | 8270 |
| 3 | Naturopathy | 143.00 | 36.80 | 106.20 | 800 | 112 |
| 4 | MSRTC-Drivers Training (Shahada) Programme | 534.00 | 361.53 | 172.47 | 100 | - |
| 5 | Mahua - Manav Vikas | 336.36 | 336.36 | 0.00 | 4500 | 4500 |
| 6 | Amchur - Manav Vikas | 544.50 | 544.50 | 0.00 | 3000 | 3000 |
| **Total** | | **29136.6936** | **7345.5244** | **21791.1692** | **50800** | **7527** |

## १. एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना

**कर्ज योजनेचे स्वरुप-**

**अ) मुदत कर्ज योजना - (वैयक्तिक)**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i)एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जिन कर्ज हिस्सा | ५% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | ५% |

सदर कर्ज योजने अंतर्गत लहान उद्योगधंदे (रु.३.०० लक्ष), कृषी संलग्न व्यवसाय (रु.२.०० लक्ष), हॉटेल ढाबा (रु.५.०० लक्ष), स्पेअर पार्ट / गॅरेज / ऑटो वर्क शॉप (रु.५ लक्ष), वाहन व्यवसाय (रु.१०.०० लक्ष) यांसारख्या योजनांसाठी अल्प व्याजदराने कर्ज वाटप करण्यांत येते.

**ब) महिला सशक्तीकरण योजना :- (वैयक्तिक)**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i) एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जिन कर्ज हिस्सा | १०% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | निरंक |

सदर कर्ज योजने अंतर्गत स्थानिक पातळीवर वाव असणारे व्यवसाय तसेच लाभार्थींच्या पंसतीनुसार व्यवसायासाठी रक्कम रु.२.०० लक्ष कर्ज वाटप करण्यांत येते.

**क) स्वयंसहाय्यता बचतगट योजना-**

वित्तीय विगतवारी

| | |
|---|---|
| i)एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा | ९०% |
| ii)शबरी महामंडळ मार्जिन कर्ज हिस्सा | १०% |
| iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग | निरंक |

सदर कर्ज योजनेअंतर्गत स्थानिक पातळीवर वाव असणारे व्यवसायासाठी रक्कम रु.५.०० लक्ष कर्ज वाटप करण्यात येते.

**योजनेचा उद्देश-** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत अनुसूचित जमातीतील बांधवांचे जीवनमान उंचावण्याकरिता स्वयंरोजगारासाठी कर्ज योजना राबविण्यात येतात.

**अंमलबजावणी कार्यपद्धती-** एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजना राबविणेकामी शाखा कार्यालय स्तरावर संबंधित कार्यक्षेत्रातील प्रकल्प अधिकारी हे मूल्यमापन समितीचे अध्यक्ष आहेत. सदर योजनेसाठी प्राप्त प्रस्तावानुसार शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ यांनी आयोजित केलेल्या सभेस संबंधित प्रकल्प अधिकारी उपस्थित राहून योग्य व पात्र लाभार्थीची निवड होणेकामी उपस्थित इच्छुक उमेदवारांची मुलाखत, कागदपत्र पडताळणी तसेच कर्ज परतफेड करु शकणाऱ्या लाभार्थींचा मूल्यमापन समितीचे शिफारशीने मुख्य कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यात येतो. त्यानुसार शाखा कार्यालयाकडील संबंधित लाभार्थींचे प्राप्त प्रस्तावास मुख्य कार्यालयाकडून मंजुरी देण्यांत येते.

**कर्ज योजनांसाठी पात्रता अटी** :-

१) लाभार्थी अर्जदार अनुसूचित जमातीचा असावा.

२) लाभार्थीचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ग्रामीण व शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु.३,००,०००/- इतकी आहे.

३) लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४५ वर्ष या दरम्यान असावी.

४) महिला सशक्तीकरण योजनेसाठी व स्वयंसहाय्यता बचतगट योजनेसाठी लाभार्थ्यांकडून कोणताही वैयक्तिक सहभाग मार्जिन मनी अपेक्षित नाही. तथापि इतर योजनांसाठी स्वत:चा हिस्सा म्हणून ५% सहभाग रक्कम घेण्यांत यावी.

५) महिला लाभार्थ्यांच्या बाबतीत जात प्रमाणपत्र नसल्यास महिलेच्या पतीचे अथवा मुला मुलींचे जात प्रमाणपत्र देखील ग्राहय धरावे.

६) रक्कम रु.५.०० लक्ष पेक्षा अधिक कर्ज योजनेसाठी एक सक्षम जामिनदार घेण्यांत यावे.

**कर्ज योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे** :-

१) तहसील किंवा उपविभागीय कार्यालय (प्रांत) यांचा जातीचा दाखला. (फक्त आदिवासी)

२) शाळा सोडल्याचा दाखला. (वय वर्ष १८ ते ४५)

३) तहसील कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी रु.३,००,०००/- इतके असावे.)

४) व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालिका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.

५) व्यवसाय प्रकल्प अहवाल संबंधित शाखा व्यवस्थापक यांनी स्वत: इच्छुक लाभार्थींना मार्गदर्शन करुन संक्षिप्तरित्या तयार करुन देणे.

६) व्यवसायासाठी लागणारे सर्व साहित्याचे कोटेशन.

७) रेशनकार्ड छायाप्रत.

८) आधारकार्ड.

९) पॅनकार्ड असल्यास त्याची छायाप्रत.

१०) लाभार्थ्यांचे स्वत:चे बॅंक खात्याचे पासबुकची छायाप्रत.

११) तीन पासपोर्ट साईज फोटो.

१२) वाहन व्यवसायासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) यांचे प्रचलित कायद्यानुसार परमिट वाहनासाठी आवश्यक कागदपत्रे.

**बचतगट / सहकारी संस्थांसाठी आवश्यक कागदपत्रे-**

१) बचतगट / सहकारी संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र.

२) बचतगट / सहकारी संस्थांचे सर्व सभासद यादी, त्यांचे रेशनकार्ड व जातीचे दाखले.

३) बचतगट / सहकारी संस्थांचे कमीत कमी सहा महिन्यांचे बॅंक खाते उतारा / स्टेटमेंट.

४)व्यवसाय करण्यासाठी ग्रामपंचायत क्षेत्रासाठी स्वयंघोषणापत्र व नगरपालिका क्षेत्रासाठी दुकाने अधिनियमाखालील परवाना.

५) व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्याचे कोटेशन.

**योजनानिहाय व्याजदराचा तपशील–**

१) महिला सशक्तीकरण कर्जावर द.सा.द.शे.४% एवढया अल्प दराने सरळ व्याज आकारले जाते.

२) रु.५ लक्ष पर्यंतचे कर्जावर द.सा.द.शे.६% सरळ व्याज आकारले जाते. तर रु.५ लक्ष ते रु.१० लक्ष पर्यंतचे कर्जास द.सा.द.शे.८% सरळ व्याज आकारणी केली जाते.

३) रु.१० लक्ष वरील कर्जास द.सा.द.शे.१०% सरळ व्याज आकारले जाईल.

| Scheme Name | Sr. No | Particulars | Target | Fund Received No.Units | Fund Received | Disbursed units | Fund Disbursed |
|---|---|---|---|---|---|---|---|
| NSTF DC NEW Delhi Scheme | 1 | Mahila Sabalikaran (2 lakh) | 202 | 202 | 36360000.00 | 202 | 36360000.00 |
| | 2 | AGriculture & Allied Bussines (Rs.2 Lakh) | 264 | 256 | 46080000.00 | 256 | 46080000.00 |
| | 3 | Hotel/Dhaba (Rs.5 Lakh) | 60 | 57 | 25650000.00 | 56 | 25200000.00 |
| | 4 | Workshop/Spare Parts (Rs.5 Lakh) | 53 | 43 | 19350000.00 | 43 | 19350000.00 |
| | 5 | Vehicle Scheme (Rs.10lakh) | 19 | 18 | 16200000.00 | 18 | 16200000.00 |
| | 6 | Small scale Bussines (Rs.3 Lakh) | 32 | 31 | 8370000.00 | 31 | 8370000.00 |
| | 7 | Self Help Group (5Lakh) | 121 | 79 | 35550000.00 | 74 | 33300000.00 |
| | 8 | Bussines help for Handicap People strngthening (Electric cycle) (1 Lakh) | 17 | 8 | 720000.00 | 1 | 90000.00 |
| | 9 | Passenger Vehicle (10 Lakh) | 39 | 33 | 29700000.00 | 27 | 24300000.00 |
| | 10 | Transport Vehicle (10 Lakh) | 39 | 36 | 32400000.00 | 34 | 30600000.00 |
| | 11 | Auto Rikshow (2.40 Lakh) | 45 | 31 | 6696000.00 | 18 | 3888000.00 |
| | 12 | AVKS (10 Lakh) | 50 | 25 | 22500000.00 | 1 | 900000.00 |
| | | **Total** | **941** | **819** | **279576000.00** | **761** | **244638000.00** |

## २.राज्य शासनाच्या कर्ज योजना

**योजनेचे स्वरुप-**

**अ) राज्य शासन पुरस्कृत मुदत कर्ज योजना -**

वित्तीय विगतवारी

i) राज्य शासन कर्ज हिस्सा ९०%

iii)लाभार्थी वैयक्तिक सहभाग १०%

सदर योजने अंतर्गत खालील योजनांचा समावेश आहे.

१) कृषी आणि संलग्न व्यवसाय (रु.५ लक्ष)
२) हॉटेल ढाबा व्यवसाय (रु.५ लक्ष)
३) वर्क शॉप / स्पेअर पार्ट (रु.५ लक्ष)
४) वाहन व्यवसाय (रु.१० लक्ष)
५) वाहन व्यवसाय (रु.१० लक्ष पेक्षा जास्त व रु.१५ लक्ष पर्यंत)
६) लघु उद्योग व्यवसाय (रु.३ लक्ष)
७) ऑटो रिक्षा / मालवाहू रिक्षा (रु.३ लक्ष)

**व्याजदर-** मुदत कर्ज योजने अंतर्गत रु.५.०० लक्ष पर्यंतच्या कर्ज योजनांसाठी ६% सरळ व्याजदर व रु.५.०० लक्ष ते रु.१५.०० लक्ष पर्यंतच्या कर्ज योजनांसाठी ८% सरळ व्याजदर राहील. सदर कर्जाची परतफेड ५ वर्षात (२० त्रैमासिक हप्त्यात) करावयाची आहे.

**ब) राज्य शासन पुरस्कृत महिला सशक्तीकरण योजना (रु.२ लक्ष):-**

वित्तीय विगतवारी

i) राज्य शासन कर्ज हिस्सा १००%

ii) लाभार्थी वैयक्तिक सहभाग निरंक

**व्याजदर-** ४% सरळ व्याजदर. सदर कर्जाची परतफेड ५ वर्षात (२० त्रैमासिक हप्त्यात) करावयाची आहे.

**क) राज्य शासन पुरस्कृत स्वयंसहाय्यता बचतगट योजना (रु.५ लक्ष):-**

वित्तीय विगतवारी

i) राज्य शासन कर्ज हिस्सा १००%

ii) लाभार्थी वैयक्तिक सहभाग निरंक

**व्याजदर-** ६% सरळ व्याजदर. सदर कर्जाची परतफेड ५ वर्षात (२० त्रैमासिक हप्त्यात) करावयाची आहे.

तसेच सदर याजनेसाठी आवश्यक कागदपत्रे, मुल्यमापन समिती सभा तसेच कर्ज योजना राबविण्याची कार्यवाही एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनेप्रमाणे राहील.

**योजनेचा उद्देश-** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत अनुसूचित जमातीतील बांधवांचे जीवनमान उंचावण्याकरिता स्वयंरोजगारासाठी कर्ज योजना राबविण्यात येतात.

